
म ग्रं सं वाचनालय शाखा ठाणे
विषय नाटक
दा क्र ११११७
IRBK-0101117

# ...तोंडी.



IRBK-0101117
IRBK-0101117

बाजी:—हो पुढें हुश्शार !

[ मा. आ. कामतकृत. ]

दा. क्र. ११९६

मराठी ग्रंथ संग्रहालय
नोंद नं. ६०५९
ठाणे.

मराठी ग्रंथ संग्रहालय
वा. नाटक नं. ८५
ता. ३०-१२-३३
ठाणे.

ना.
४०८


प्रकाशकः—माधव आप्पाजी कामत.
हनुमान टेरेस ४ था मजला, लॅमिंगग्टन रोड, मुंबई नं. ७.

मुद्रकः—आर. डी. देसाई.
न्यूभारत प्रिंटिंग प्रेस, गिरगांव मुंबई.

( सर्व हक्क लेखकाच्या स्वाधीन )

---

आपलें हालणारे, दुखणारे दांत




अनंत दंतरोगांवर सर्वोत्कृष्ट
अनंत काळी टुथ पावडर
वापरल्यानें मजबूत व स्वच्छ राहातील.
सर्वत्र ] एकदां वापरून तर पहा ! [ मिळते.
एजंट्स्:--महाले आणि कंपनी, गिरगांव मुंबई.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :- खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

[illegible]

# यशवंत स्वदेशी स्टोअर्स

लालबाग ट्रॅम टर्मिनस मुंबई नं. १२.

आमचेकडे खंबायत, राकल, कोईमतूर, महेश्वर, सोलापूर, भिवंडी मालेगांव, मदुरा, व हिंदुस्थानांतील सर्व मिलचें कापड, साधे व वुलन् कोटींग, तऱ्हतऱ्हेच्या धोतरजोड्या, लुगडीं, खण, पातळ, लॅकेट्स वगैरे माल किफायत भावानें मिळेल.

एकवेळ येऊन खात्री करा.

---

# मोहन एजन्सी

केमिस्टस् ॲन्ड ड्रगिस्टस्.

लालबाग मुंबई नं. १२.

सर्व प्रकारचीं औषधें मिळण्याचें

**एकच खात्रीलायक ठिकाण.**

बाहेरगांवच्या ऑर्डर्स् काळजीपूर्वक पाठविल्या जातील.

मराठी ग्रंथ संग्रहालय
नोंद नं. ६९५८
IRBK-0101117
IRBK-0101117
संग्रहालय
नाटक नं. ५५
ता. ३०-१२-३३

"श्री देवकी-कृष्ण प्रसन्न"

# तोफेच्या-तोंडी

११९८

## नांदी

नाटक ७०

१ पद—राग—शंकरा ताल रूपक.

प्रणति प्रभुवर चरणिं सविनय करित युवगण द्याया
धृति बल ॥ धृ० ॥
विपुल धनवति । अवनिं रिपुकरिं ॥ कुदशा छळित राखा
निजब्रिद ॥ १ ॥
सुफल कृषिवल सधनिं सुविरत । समता सगुण, ध्येया
अनुकुल ॥ २ ॥

## अंक पहिला.

### प्रवेश पहिला.

स्थळः—मानाजीरावाची गढी

**बाजी**—मानाजीराव, तुमची गढी म्हणजे गोसाव्यांची मठी नव्हे, कीं वाटेल त्या गोसावड्यांनीं येऊन, तुमच्या गैर हजेरींत धांगड धिंगा घालावा ! अलिकडे यांचा फारच सुळसुळाट झाला आहे. बेटे राजकारणाच्या लांब लांब गप्पा मारतात आणि पादशहा विरुद्ध बंडाळी करण्याला प्रोत्साहन देतात ! असल्या गोसावड्यांना आपल्या गढींत आपल्या मुलींनीं आश्रय देणं, म्हणजे उघड उघड त्यांना मदत केल्यासारखी होईल; आधींच पादशहाचं मन आपल्या विषयीं कलुषित झालेलं

आणि ही बातमी जर पादशहाच्या कानावर गेली तर, आगींत तेल ओतल्या-सारखं होईल.

**मानाजीराव**—बाजी, आपण मला योग्य वेळीं सावध केलंत, नाहीं तर आपण माझ्या विषयीं पादशहाचा रोष नाहींसा करण्याकरितां प्रयत्न करीत आहांत त्यांत हें नसतं विघ्न उत्पन्न व्हायचं! मला आतां खबरदारी घेतलीच पाहिजे. नीरे.—

**नीराः**—( प्रवेश करून ) काय बाबा ?

**मानाजीः**—अशी पुढं ये आणि मी विचारलेल्या प्रश्नाचं सरळ उत्तर दे! बोल , काल आपल्या गढींत कोण आले होते ?

**नीराः**—दोन गोसावी आले होते पण,—

**मानाजीः**—पण काय ? कशाला आले होते ते ?

**नीराः**—तिन्हीसांज झाल्यामुळं निवाऱ्यासाठीं आपल्या गढींत आले होते.

**मानाजीः**—धर्मशाळा नाहींत वाटतं निवाऱ्याला ? आमची गढी म्हणजे गोसाव्यांची मठी कीं काय आणि तुम्हीं त्यांना आश्रय दिलांत ?

**नीराः**—होय त्यांत काय झालं ?

**मानाजीः**—त्यांत काय झालं ? लाज नाहीं वाटत वर तोंड करून बोलायला ?

**मीराः**—( पुढें होऊन ) बाबा, ते गोसावी कोण होते, हें जर आपल्याला समजलं, तर आपण आमच्यावर रागावणार नाहीं खास!

**मानाजीः**—म्हणजे ?

**मीराः**—बाबा, आपण शहाजी राजांना ओळखतांनां ?

**मानाजीः**—ओळखतों! पण त्यांचा या गोसाव्यांशीं काय संबंध ?

**नीराः**—नुसता संबंध नसून अगदीं जवळचा संबंध आहे. त्यांचं आपण आनंदानं स्वागत केलें, हें जर त्यांना समजलं तर—

**मानाजीः**—नीरे, अशा संदिग्ध बोलण्यानं उगाच माझा संताप वाढवूं नकोस!

**मीराः**—बाबा, संताप कां म्हणून, उलट संतोष वाटेल, आणि आमच्या कामगिरी बद्दल आमचं कौतुकच कराल! आतां उघड उघड सांगते, शहाजी राजांचे पुत्र शिवाजी राजे यांचे ते अनुयायी होते!

**नीरा**:—आणि उद्यां कदाचित शिवाजी राजेच आपल्याला भेटायला येतील, असं त्यानीं जातांना निरोप दिला आहे.

**बाजी**:—मानाजीराव, शिवाजी जर आपल्याला भेटायला येणार असेल, तर त्याची भेट घेऊं नका ! एकवेळ हे गोसावडे पत्करले, पण त्याच्याशीं कोणत्याही प्रकारचा संबंध ठेऊं नका.

**मीरा**:—बाजीसाहेब, इतके कां शिवाजीराजे वाईट आहेत ?

**बाजी**:—होय ! कोण म्हणतो त्याला राजे म्हणून ! बापाच्या नांवावर इतके दिवस राजेपण मिरवीत होता. भर दरबारांत पादशहाला कुर्निसात न करतां उद्धटपणानं वागला तेव्हां शहाजीच्या रदबदलीमुळं, त्याच्याकडे पादशहानं कानाडोळा केला, त्यामुळं त्याचा उद्धटपणा बेसुमार वाढला. भर दिवसा त्यानं दोन कसार्यांना ठार मारलं. साहजीकच शहाजीकडे ही फिर्याद रुजू झाली, न्यायाच्या कार्यांत अपत्यप्रेमाचा जय झाला, उलट फिर्याद करणाऱ्या लोकांनाच शिक्षेची भीती घातली. अशी अनेक अत्याचारी कृत्यं त्याच्याकडून होत गेल्यामुळं, त्याला आपल्यापासून दूर केला नाहीं, तर कदाचित आपल्यावर शहाची गेरमर्जी होईल, या भीतीनें शहाजीनें त्याला घरांतून हाकलून लावलं ! आतां त्यानं इकडे येऊन पादशाही विरुद्ध पुंडाई सुरू केली आहे.

**मीरा**:—पण त्यानीं खून कां केले ?

**बाजी**:—कांहीं कसायानीं भररस्त्यांत गोवध केला म्हणून !

**मीरा**:—मग त्यानीं त्यांना योग्य प्रायश्चित दिलं, असं तुम्हांला वाटत नाहीं कां ? गोमातेचा वध उघड्या डोळ्यानीं पाहणाऱ्याला मी तर हिंदूच म्हणणार नाहीं !

### २ पद—राग–सारंग ताल–त्रिवट.

**कोण गणिल जागिं कृतार्थ पुरुषा ? ॥ माय यवनकरिं; उदास हतबल ॥ धृ० ॥ नवनित मधुमय सुखवित जगता ॥ सेवा–निरत कृतार्थ कृषिवल ॥ १ ॥**

बाजी साहेब, त्याच्याजागीं तुम्हीं असतां तर काय केलं असतं ?

**बाजी**:—त्याच्यासारखा उतावळेपणानं मी खून करायला तयार झालों नसतों !

**नीरा**:—मग आपण काय केलं असतं ?

**बाजी**:—नीरे, सत्तेपुढं शहाणपण चालत नाहीं.

**मीरा**:—म्हणून तुम्हीं हात चोळीत स्वस्थ बसलां असतां ? बाजीसाहेब, मी म्हणतें, शिवाजीराजांनीं केलं तेंच योग्य केलं, प्रत्येक हिंदूला शिवाजीराजांच्या कृत्याबद्दल अभिमान वाटला पाहिजे. आपण हिंदू आहांत, आपलं दरबारांत वजन आहे, पादशहाकडून या कृत्यांचा प्रतिबंध करवयाला पाहिजे होता. उलट तुम्हीं शिवाजीराजांना दोषी ठरवितां ?

**बाजी**:—मीरा, हें राजकारण आहे. काळवेळ पाहून वागलं पाहिजे. पादशहाशीं बोलतांना देखील, त्याच्या मनाचा कल पाहून बोललं पाहिजे. शिवाजीचं हे खुनी कृत्य केव्हांही कुणाला अविचाराचं वाटेल. केवळ गोवधासाठीं दोन माणसांचे खून करणं न्यायाचं ठरेल कां ?

**मानाजी**:—बाजीसाहेब, खुनाची कृती अविचाराची असली, तरी हिंदूना आपल्या प्राणापेक्षां प्रिय असलेल्या गोमातेचा वध करणं सुविचाराचं ठरत नाहीं. याचा प्रतिकार प्रत्येक हिंदूनं केलाच पाहिजे. पादशहाजवळ याचा न्याय मागितला पाहिजे.

**मीरा**:—बाबा, ही गोष्ट पादशहाला माहीत नाहीं असं कां तुम्हाला वाटतं ? दरबारांतील अमीर उमराव आणि हिंदू म्हणविणारे सरदार, जाणून बुजून या कृत्यांकडे कानाडोळा करूं लागले, तर पादशहाला तरी आपल्या जातिबांधवांत असंतोष उत्पन्न करण्याचं काय कारण आहे ?—

### ३ पद–राग–कॉफी–ताल–एकताल.

**नृपति सुखविलासीं ॥ मग्न सदां अंध होत, नुमजे जन–क्लेशा ॥ ध्रु० ॥ वत्सलता भूत–दया ॥ धर्म भाव नीति नया ॥ भूषविती भूषणेंचि ॥ नृपती कुल–वंशा ॥ १ ॥**

**मीरा**:—खुद्द विजापुरांत एवढी बेबंदशाही चालली असतां, त्याचा प्रतिकार पादशहा करीत नाहीं, तर पादशाही मुलुखांत अमीर उमरावानीं केलेल्या अत्याचाराची विचारपुस कोण करतो ? ज्या पादशाहींत हिंदू स्त्रियांच्या अब्रूवर घाला घालण्याची भीति, ज्या पादशाहींत गोवधाला प्रतिबंध नाहीं, त्या पादशाहीसत्तेला प्रतिकार करण्याचं धाडस, ज्या जातिवंत मराठ्यानं दाखविलं, त्या धाडसी वीराचं स्वागत कोणता हिंदू करणार नाहीं ? बाजीसाहेब, बाबानीं त्यांची भेट देखील घेऊं नये, असा त्यानीं बाबांचा काय अपराध केला आहे !

**बाजीः**—मीरा, पादशहाच्या गुन्हेगाराला, आपल्या गढींत येऊं देणं म्हणजे त्याच्या कृत्याचा पुरस्कार करण्यासारखंच होय. पादशहाचा अपराधी म्हणजे सर्व प्रजेचा अपराधी ! तशांत मानाजीरावांनीं त्याची भेट घेणं म्हणजे, पादशाहीरोषाला बोलावणं पाठविल्यासारखंच होईल. अद्यापपर्यंत शिवाजीच्या पुंडाईकडे, पादशहानं शहाजीकडे पाहून दुर्लक्ष केलं आहे. पादशहाच्या मनांत आलं–तर शिवाजीला कैद करायला कितीसा वेळ लागणार ? कालचं पोर तें ! त्याच्या हातून काय होणार आहे पादशाही सैन्यापुढं ?

**मीराः**—बाजीसाहेब, त्यांच्या हातून काय होणार आहे, हें विचारण्यापेक्षां, तुमच्या हातून काय होणार आहे, याचा आधीं विचार करा.

**मानाजीः**—मीरा, बस्स झालं हें तुझं शिवपुंडाईचं पुराण ! बाजीसाहेब सांगतात तें आपल्या कल्याणाकरितांच ! मग त्याबद्दल त्यांचे आभार मानायचे सोडून त्यांनाच दूषण देतेस ? लहान तोंडी मोठा घास शोभत नाहीं. शिवाजी चांगला असो अगर वाईट असो. मी जोपर्यंत पादशहाचं अन्न खातों आहे, तोंपर्यंत तरी त्याची भेट घेणं, म्हणजे पादशहाशीं द्रोह करण्यासारखंच होय. तेव्हां मी तुम्हाला बजावून ठेवतों कीं यापुढं शिवाजीच्या अनुयायांना अगर त्याला आपल्या गढींत येऊं देतां कामा नये, हें लक्षांत ठेवा.

६०५४ नाटक ७५८४ 30-12-33

## प्रवेश २ रा.

### स्थळ–रस्ता.

**मुधोजी**—हिरोजी, आपण जर यापुढं असे हात हालवीत स्वस्थ बसलों, तर आपल्या बायका पोरांचे जीव धोक्यांत आहेत म्हणून समज. कालचा अमीर पाहिलास ना किती मगरूर होता तो ! सत्तेच्या जोरावर पिराजीच्या बायकोला पळवून नेत असतांना, ती त्याच्या हातून सुटण्याचे प्रयत्न करीत होती, पण कुणी तरी तिची सोडवणूक केली कां ? उलट सगळे पुरुष “ आ ” करून तिच्याकडे पहात होते, पण प्रतिकार करण्याची कुणाची छाती झाली नाहीं.

**हिरोजी**—मुधोजी, तुझं म्हणणं कांहीं खोटं नाहीं. पण त्याचा आपण प्रतिकार करायचा म्हटला, तर लोकांत एकी पाहिजे. नाहीं तर विनाकारण पुढाऱ्यांचे जीव मात्र धोक्यांत यायचे.

**मुधोजी**—पण प्रयत्नावांचून एकी कशी होणार ! आतां प्रत्येक हिंदूनें स्वतार्चं व बायका पोरांचं रक्षण करण्याची तयारी केली पाहिजे. खेड्यापाड्यांत जाऊन संघशक्ती निर्माण केली पाहिजे. आपल्या नशिबाला बोल लावून स्वस्थ बसल्यानं दिवसा ढवळ्या घडून येणारे अत्याचार कांहीं बंद पडणार नाहींत. मी तर निश्चय केला आहे कीं, प्राण जावो किंवा राहो, पण अशा अत्याचारांचा प्रतिकार केल्याशिवाय राहणार नाहीं.

**हिरोजी**—मला वाटतं—असं उघड उघड दरबारच्या अमीर उमरावाशीं दोन हात करण्यापेक्षां, विजापुरला जाऊन शहाजीराजांना ही परिस्थिती कळवावी, म्हणजे ते असले अत्याचार बंद पाडल्याशिवाय राहणार नाहींत. ते हिंदू आहेत—

**मुधोजी**—म्हणूनच त्यांच्या हातून काम होत नाहीं. नाहीं तर त्यांना हिंदुत्वाचा अभिमान असता, तर हिंदु स्त्रियांची विटंबना आणि गोमातेचा वध त्यांनीं उघड्या डोळ्यांनीं पाहिला नसता. हिरोजी, "राजे" हा किताब त्यांना बादशहाकडून मिळाल्यापासून ते नांवाचे हिंदू राहिले आहेत.

**हिरोजी**—मुधोजी, हळू बोल ! हें तुम्हीं कुणाविषयीं काय बोलतां, याचा विचार केला आहांत काय ? तुम्हीं उघड उघड शहाजीराजांवर आरोप करतां ! शहाजी राजे म्हणजे विजापुरच्या पादशाहीचे आधारस्तंभ ! त्यांच्या शौर्यावरच आतांपर्यंत विजापुरची पादशाही तग धरून राहिली आहे.

**मुधोजी**—आणि त्यामुळंच त्यांचा मान मरातब दरबारांत वाढला, पण हिंदु प्रजेचा मात्र छळ चालला आहे, याच्याकडे लक्ष देण्याला त्यांना वेळ नाहीं अगर त्यांच्या वतीनं पादशहाजवळ रदबदली केली, तर कांहीं उपयोग होणार नाहीं. या जाणिवेनं डोळे मिटून स्वस्थ बसले असतां, आम्हीं त्यांच्यावर आरोप केला तर गुन्हा होतो कां ?

( दोन मावळे प्रवेश करतात )

**पहिला मावळा**—मुधोजीराव, आम्हां हिंदूचा कोणी वाली राहिला नाहीं ! बळी तो कान पिळी ! तेव्हां आम्हां गरिबांचं गाऱ्हाणं कोण ऐकतो ? आम्हीं गुरांना घेऊन घरीं येत होतों; वाटेंत आमच्या धाकट्या पोरीला कोणी पळवून नेत असलेलं पाहून, आम्हीं त्यांचा पाठलाग करायला लागलों; पण काय सांगू ! त्यापैकीं एका स्वारानें गोळी झाडली, त्याला माझा धाकटा भाऊ बळी पडला आणि आम्हीं त्याचं शव घेऊन घरीं येतों–तर आमचं घरदार अग्नि नारायणाच्या भक्ष्यस्थानीं पडलेलं होतं !

**हिरोजी**—पण घराला आग कुणी लावली ?

**२ रा मावळा**—हिरोजीराव, काय सांगूं तुम्हांला ? त्या वेळेची आठवण झाली कीं कांटा उभा राहतो अंगावर ! सहा सशस्त्र घोडे स्वार, जेव्हां यांच्या घराकडे आले, त्यावेळीं यांची धाकटी मुलगी एकटीच घरांत होती. सशस्त्र घोडेस्वारांना पाहून भीतीनें तिनं आंतून दाराला कडी घातली, त्यांनीं दारावर धक्के मारले, पण दार उघडीत नाहींशी पाहून, त्या हरामखोरांनीं घराला आग लावली. जिवाच्या भीतीनें तिनं दार उघडलं आणि पळायला लागली; तेव्हां त्यांतील एका स्वारानं तिचा पाठलाग केला आणि तिला आपल्या घोड्यावर घालून पळून गेला ! हिरोजीराव, त्या वेळीं जर मी तिथं असतों, तर दोघांना तरी लंबे केल्याशिवाय राहिलों नसतों !

**मुधोजी**—ऐका, हिरोजीराव, या मावळयाच्या हृदयद्रावक कर्म कहाणी ऐका ! बोला, याचा जाब यांनीं आतां कुणाला विचारावा आणि न्याय तरी कुणाकडून मिळवावा ! आपले हिंदु म्हणविणारे माने-मोहिते-मोरे वगैरे मराठे सरदार विजा-पुरच्या दरबारीं खुशाल चेंडूप्रमाणं वैभवांत लोळत आहेत. त्यांच्या कानांवर या गोष्टी गेल्या नाहींत असं तुम्हांला वाटतं कां ? ज्यांना स्वतःच्या हिंदुत्वाची जाणीव नाहीं, त्यांच्याशीं गाऱ्हाणीं घालून काय फायदा होणार आहे ? आपणच आपल्या पायांवर उभं राहिल्याशिवाय गत्यंतर नाहीं.

**हिरोजी**—मुधोजी, असल्या अत्याचारांचा अतिरेक झाला कीं, परमेश्वर कुणाच्या तरी मुखीं उभा राहून, दुष्टांचा संहार करण्याची प्रेरणा करतो आणि मग तोच राष्ट्राचा-नेता म्हणून गणला जातो. कुणी सांगावं कीं, हिंदुपद पादशाही स्थापन होण्यासाठींच-हे असले हृदय थरारून सोडणारे अत्याचार घडून येत असतील !
[ नेताजी व शिवाजी सरदारांच्या वेशांत येतात. ]

**नेताजी**—होय ! हिंदुपदपादशाही स्थापन व्हावी, हिंदूची गुलामगिरींतून सुटका व्हावी, अशी प्रत्येक हिंदूची इच्छा असली कीं राष्ट्राचा-नेता त्यांतूनच निर्माण होतो.

४ पद—राग—यमन ताल—एकताला.

**सुख-साधनिं यवन दास्य ॥ वरितां स्वकरें स्वनाश ॥**
**नच स्वतंत्रता प्रियता ॥ स्वार्थांधशा जनास ॥ धृ० ॥**

**नृप लोळत वैभवांत ॥ जनता परि एक भुक्त ॥**
**परस्वाधिन जीवन तें ॥ श्वाना परी लांछित ॥ २ ॥**

**मुधोजी:**—कोण तुम्ही ?

**नेताजी:**—तुमच्यासारखाच मी एक हिंदु आहे. आपल्या हिंदुची होत असलेली अनावस्था पाहून, तळमळणारा एक अभागी आत्मा आहे; आणि असल्या अनेक आत्म्यांचं एकीकरण झालं कीं, हिंदू सारे एक अशी ऐक्याची भावना उत्पन्न होते.

**शिवाजी:**—मग कोणत्याही सत्ताधारी सत्तेला आपल्या पायाखालीं नमवितां येतं !

**हिरोजी:**—नुसत्या शब्दानीं जर सत्ताधारी सत्तेला नमवितां आलं असतं, तर आम्हीं स्वस्थ कां बसले असतों ! आमचेच हिंदू आमचे शत्रू ! मग त्याचा फायदा पादशहानं कां घेऊं नये ? लहानशा पदवीनं हिंदूंना आपला मिंधा करून घेतां येतं ! मग कुणाच्या जोरावर सत्ताधारी सत्तेशीं झुंझायला तयार व्हावं ?

**शिवाजी:**—असे निराश होऊं नका ! सगळेच हिंदू कांहीं स्वाभिमानाला पारखे झाले नाहींत. आम्हीं जर तुम्हांला जोर दिला, तर तुमची तयारी आहे कां स्वातंत्र युद्धाला ?

**मुधोजी:**—तुम्हीं कोण हें अगोदर कळल्याखेरीज, तुमच्या शब्दावर आम्हीं कसा विश्वास ठेवावा ? आमच्या मनाचा ठाव घेण्याकरितां कदाचित तुम्हीं—

**शिवाजी:**—दरबारचे हेर नसतील कशावरून असंच म्हणणार होतांना ? तुमचा संशय कांहीं अनाठायीं नाहीं. मघाशीं हिरोजीनें म्हटल्याप्रमाणं लहानशा पदवीनं देखील हिंदु परक्यांचा बंदा गुलाम होतो. अशाच "राजे" या पदवीनं बंदा गुलाम झालेल्या एका हिंदूचा मी मुलगा आहे. पण ती गुलामगिरी मला असह्य झाल्यामुळं, वडिलांच्या आश्रयावर लाथ मारून, हिंदूचं दैन्य नाहींसं करण्याचं प्रतिज्ञाकंकण मी हातीं बांधलं आहे.

**हिरोजी:**—म्हणजे आपण शिवाजी राजे कां ?

**शिवाजी:**—( वेश टाकून ) होय ! पण कृपा करून "राजे" या शब्दान मला संबोधूं नका ! "राजे" या शब्दाच्या मोहानंच बाबा विजापूर पादशहाचे मिंधे झाले.

**मुधोजी:**—शिवाजी, मघाशीं शहाजीराजांविषयीं माझ्या तोंडून निघालेल्या शब्दांबद्दल आपल्याला राग तर आला नाहीं ना?

**शिवाजी:**—मुधोजी, राग तर आला नाहींच उलट आपल्या स्पष्टोक्तीबद्दल अभिमानच वाटला.

**नेताजी:**—मुधोजी, तुमच्यासारखे सडेतोड वृत्तीचे स्वाभिमानी तरुणच पादशहाला शह द्यायला शिवबाला उपयोगी पडतील.

**हिरोजी:**—पण पादशहाला शह देण्याला, मनुष्य बळाबरोबर द्रव्यबळाची आवश्यकता आहे.

**नेताजी:**—त्यासाठींच आपणाला, देशमुख, देशपांडे आणि कुलकर्णी यांची भेट घेऊन, त्यांना आपल्या कार्याला अनुकूल करून घेतले पाहिजेत. कर वसुलीची रक्कम पादशहाकडे पोंचविण्या ऐवजीं, भाले, बर्ची, बंदुका वगैरे विकत घेण्यासाठीं त्याचा विनियोग केला पाहिजे.

**शिवाजी:**—आज जरी आपल्याला उघड उघड पादशाही सत्तेशीं टक्कर देतां आली नाहीं, तरी देशपांडे, पाटील आणि कुलकर्णी यांची आपल्याला मदत असल्यावर, त्यांच्या ताब्यांत असलेले गांव आपल्या मालकीचे होतील. मग आपल्याला गनिमीकाव्यानेंच गनिमाशीं टक्कर द्यावी लागणार!

**मुधोजी:**—शिवबा, आपण पादशाही विरुद्ध बंडाचं बीजारोपण करतों म्हणून पादशहानं जर शहाजीराजांना या मोहिमेवर पाठविलं आणि कदाचित त्यांच्याशीं सामना द्यायचा आपल्यावर प्रसंग आला तर—

**शिवाजी:**—हा शिवाजी आपल्या कार्या पासून रतिभरही पाऊल मागं टाकणार नाहीं!

### ५ पद—राग-तिलंग ताल. दादरा

**दास्यमोचना विना अन्य भावना। स्पर्श क्षण न करित या मना ॥धृ०॥ हिंदु धर्म संवर्धुनि गोमाता पालना ॥ भाव-बंध तोडुनि शिव करिल देह-दाना ॥ १ ॥**

**मुधोजी:**—शिवबा, आम्हीं देखील आपणाला मदत करायला तयार आहोंत.

**हिरोजीः**—आजपासून आपण आमचे पुढारी आहांत आणि आपण सांगाल तें करायला आम्हीं देखील जिवाची तमा धरणार नाहीं.

**मावळाः**—महाराज, आम्हीं मावळे देखील या यवनांच्या छळाला कंटाळलों आहोंत. आपण जर त्यांचे पारीपत्य करायला आला आहांत, ही बातमी जर सगळ्या मावळ्यांना समजली. तर मावळकोंड्यांतील सगळे मावळे, आपल्या पायांची सेवा करायला तयार होतील.

**शिवाजीः**—मावळ्या मराठ्यांच्या मदतीनंच मी हातीं घेतलेलें कार्य पूर्ण होणार, या विश्वासानेंच मी या मावळकोंड्याला आलों आहे.

**नेताजीः**—आपल्याला विजापुरच्या पादशहाशीं टक्कर द्यायची आहे, तेव्हां आपण आज कोणतीही गोष्ट पूर्ण विचारानेंच केली पाहिजे. तुम्हीं उद्यां रात्रीं इतर मावळे मराठ्यांना जमवून आम्हांला इथं भेटा, म्हणजे आपल्याला पुढच्या कार्याची रूप रेशा व्यवस्थित रितीनं आखतां येईल !

## प्रवेश २ रा.

### स्थळः—देवडी.

**सर्जेराव**—काय करावं आतां ? तलवारीकडे पाहिलं कीं, डोळे पांढरे होतात, म्हणून तिला सदोदित म्यानांतच ठेवतों. पण या बाजीसाहेबांच्या तैनातींत राहिल्यापासून, दिवसांतून एकदां तरी दोन हात करण्याचा प्रसंग आल्याशिवाय राहात नाहीं ! काय तो कालचा भयंकर प्रसंग ! आठवण झाली कीं, अजूनहि अंगावर कांटे उभ राहतात ! एका हिंदु कुमारिकेला पळवून आणण्यासाठीं घराला आग लावली काय–दोन माणसाचे बळी घेतले काय–आणि तिला आतां आंतल्या खोलींत कोंडून ठेवलं आहे ! माझ्या शिवाय कुणालाही आंत जाऊं देऊं नकोस, असं बाजीसाहेबांनीं मला बजावून सांगितलं आहे. काय करूं ? पहारा करण्याचें काम माझ्यावर सोपविल्यामुळं, गिरिजेला भेटायला मिळत नाहीं ! (गिरीजा येते.) कोण गिरिजा ! तुला शंभर वर्षं आयुष्य !

**गिरिजा**—कशाला एवढं आयुष्य ! सर्ज्या, तुलाच तें लक्ष लाभ होवो !

**सर्जेराव**—कां इतक्यांतच कंटाळलीस आयुष्याला ? दीर्घायुषी होण्याकरितां तपं करतात तपं !

७५४११

**गिरिजा**—मग काय तुझ्या आशिर्वादानं माझं आयुष्य वाढणार ? जसा कांहीं तूं महंतच कीं नाहींस ?

**सर्जेराव**—महंतच कशाला पाहिजे ? या सर्जेरावांची वाणी ब्रह्मदेवाला देखील खोटी करतां येणार नाहीं ?

**गिरिजा**—जशी काय तुझ्या वाणींत कालीदेवीच बसली असेल ?

**सर्जेराव**—काली देवी कशाला ? तिच्या पुढं थोडंच मी माझं डोकं उडवायला उभा होतों ! तो काळ गेला आणि आतां नवा काळ आला ! वाणीचा खरेपणा अलीकडे दांतावर अवलंबून असतो ! बत्तीशी उडालेल्या म्हाताऱ्याच्या वाणींत खरेपणा नसतो–पण बत्तीस दांताची वाणी कधीं खोटी ठरत नाहीं ! पहा, हवेतर माझे बत्तीस दांत आहेत कीं नाहींत ते ?

**गिरिजा**—कशाला उगीच बत्तीशी उघडतोस ? तूं वाणीचा खरा आहेस कीं नाहीं याची परीक्षा पाहण्यासाठीं मी इथं आलें आहे.

ग्रंथ संग्रहालय नोंद नं. ६०५४

**सर्जेराव**—कर माझी परीक्षा ?

**गिरिजा**—थोडक्यांत ! तुझे बाजीसाहेब या वेळीं कुठं आहेत ?

**सर्जेराव**—ते मानाजीरावांच्या गढींत असतील !

**गिरिजा**—पण तूं इथं काय करीत आहेस ? घरीं का आला नाहींस मला भेटायला ?

**सर्जेराव**—आलों असतों ! पण—

**गिरिजा**—पण काय–असा घुटमळतोस कां ?

**सर्जेराव**—पहारा करण्याचें काम त्यानीं माझ्यावर सोपविलं आहे !

**गिरिजा**—इथं तर कुणी दिसत नाहींत ! मग कुणावर पहारा करतो आहेस !

**सर्जेराव**—कुणाजवळ बोलणार नाहींस ना ?

**गिरिजा**—मी कशाला बोलूं ! पण असं गुपीत तरी काय आहे !

**सर्जेराव**—तेंच मी तुला आतां सांगणार आहे ! पण कुठं याची वाच्यता करायची नाहीं ! याला तुझी आहे कबुली ?

**गिरिजा**:—कबुल ! कबुल ! कबुल ! कितींदा माझ्याकडून कबुली घेणार आहेस !

**सर्जेराव**:—आंतल्या खोलींत एक बाई आहे.

**गिरिजाः**—काय बाई आहे खोलींत ? आणि तिला कोंडून ठेवलं आहे ?

**सर्जेरावः**—होय ! ती पळून जाईल म्हणून मला पहारा करावा लागत आहे.

**गिरिजाः**—म्हणजे ! तिला पळवून आणली वाटतं ? आणि अशा पोरीवर आळत ठेवण्याचं काम तूं करतोस ? लाज नाहीं वाटत सांगायला ?

**सर्जेरावः**—सांगू नको तर काय करूं !

**गिरिजाः**—सर्जा, पोरीला पळवून आणण्यांत तुम्हांला भूषण वाटलं का ? हिंदुच हिंदुंच्या पोरींना पळवूं लागले, मग यवनानीं हिंदूंच्या पोरी पळवून नेल्या तर त्यांत आश्चर्य कसलं ?

**सर्जेरावः**—गिरिजे, मला हें कृत्य आवडलं असा मात्र गैरसमज करून घेऊं नकोस ! नोकरीपेशाच असा आहे कीं, धन्याचा हुकूम पाळणं नोकरांचं कर्तव्य ठरतं !

**गिरिजाः**—पण नोकरांनीं नीति अनीतीचा विचार करायला नको का ? धन्याचा हुकूम म्हणून कोणतेंही अनीतीचं कर्म करणं योग्य आहे का ?

६ पद—राग—कानडा—ताल—त्रिताल

**कृति ही तुझी वरि दुर्गतीला ॥ गमे लाजवी जगिं सज्जनाला ॥ धृ०**
**अभिलाष स्त्रीचा नेई विनाशा ॥ दुःशासना वा रावणा ॥**
**कुपथा गताने पतिता पदाला ॥ १ ॥**

**सर्जेरावः**—नाहीं ! पहारा करीत नाहीं असं बाजीना सांगितलं असतं तर मला देखील अंधार कोठडी दाखवायला कमी केलं नसतं.

**गिरिजाः**—समज, मलाच तुझ्या बाजीसाहेबांनीं पळवून आणली असती— आणि माझ्यावर पहारा ठेवण्यासाठीं तुला सांगितलं असतं तर तूं काय केलं असतंस ?

**सर्जेरावः**—काय केलं असतं—हे सांगण्यापेक्षा मी कृतीनेंच करून दाखविलं असतं.

**गिरिजाः**—काय केलं असतंस ? सांगशील कीं नाहीं !

**सर्जेरावः**—मी तुला सोडविली असती—

**गिरिजाः**—कशी सोडविली असती ?

**सर्जेरावः**—बाजींना सांगून !

**गिरिजाः**—आणि ते कबूल झाले नसते तर—

**सर्जेराव:**—नोकरीवर लाथ मारून–तुझी मोकळीक केली असती ?

**गिरिजा:**—एवढं साहस तूं कशासाठीं केलं असतंस—तर मी तुझी बाल-मैत्रिण म्हणून होय ना ? मग तेंच साहस आतां कां करीत नाहीं ?

**सर्जेराव:**—तुझ्यासाठीं केलं असतं, पण बाजी आले तर—

**गिरिजा:**—एवढी लहानशी गोष्ट—माझ्यासाठीं करायला—तूं तर—पण करतोस ! मग तूं पुरुष कसला ? माझ्या बांगड्या भर हातांत आणि दे ती तलवार माझ्याजवळ, आणि पहा मी कसा तिचा उपयोग करतें ती !

**सर्जेराव:**—गिरिजे, तलवारीकडे पाहिलं कीं माझ्या अंगांत कापरं भरतं—म्हणून तिला मी म्यानांत ठेवतों !

**गिरिजा:**—कापरं भरतं ? शेंदाड शिपाई कुठला !

**सर्जेराव:**—अशी रागावूं नकोस ? काय करूं तें सांग !

**गिरिजा:**—चल, दार उघड आधीं ! बिचारी घाबरून गेली असेल ! ( दार उघडून तारेला घेऊन येते. ) बाई, तुमचं नांव काय ?

**तारा:**—माझं नांव तारा–माझ्या वडिलांचं नांव धनाजी पाटील. !

**गिरिजा:**—तुमचं घर कुठं ?

**तारा:**—मावळकोंड्यांत ! बाई, तुमचं देव कल्याण करो ! या कोंडवाड्यांतून माझी सुटका केलीत, माझ्या अब्रूचं रक्षण केलंत, या बद्दल मीं तुमची आभारी आहे.

**गिरिजा:**—आभार कसले मानायचे त्यांत ? माझं कर्तव्य मी केलं ! याचं सगळं श्रेय सर्जेरावांना !

**तारा:**—बाईसाहेब, तुम्हीं जर माझी सुटका केली नसती–तर अब्रूसाठीं मला—गळफांस घ्यावा लागला असता ! स्त्रियांची अब्रू म्हणजे कांचेसारखी ! कांच फुटल्यावर जसी सांधतां येत नाहीं–तशी अब्रूला मुकल्यावर–जनांत तोंड दाखवायला जागा नाही !

**गिरिजा:**— तारा, आधीं तुला इथून बाहेर काढली पाहिजे–नाहीं तर तो मांग आला म्हणजे फजितीला पारावार नाहीं ! सर्जा, हिची सोडवणूक केल्याबद्दल मला जितका आनंद वाटतो, त्याहून त्या हरामखोराकडून तुला शिक्षा होणार म्हणून जास्त दुःख वाटतं !

**सर्जेरावः**—गिरजा, तुझ्यासाठीं मी जिवाची देखील पर्वा करणार नाहीं ! पण माझ्या मरणानें बाजीसाहेबांच्या असल्या दुष्कृत्यांना थोडाच आळा बसणार आहे ! आज तारेवर जो प्रसंग आला—तो दुसऱ्या मुलीवर येणार ! माझ्या जागीं दुसऱ्या नोकाराची नेमणूक होणार ?

**गिरिजाः**—मग काय करण्याचा तुझा विचार आहे ?

**सर्जेरावः**—मला एक युक्ती सुचली आहे–( कानांत सांगतो ) असं कर म्हणजे माझ्या विषयीं त्या हरामखोराला संशय येणार नाहीं ! ( सर्जेरावाला आंतल्या खोलींत कोंडून ठेवतात. )

**गिरिजाः**—चल तारे, आतां इथं क्षणभर सुद्धां उभी राहूं नकोस !

**ताराः**—पण सर्जेरावाचं काय होईल !

**गिरिजाः**—त्याची नको तुला काळजी ! तुला लवकर तुझ्या घरीं पोचविण्याची व्यवस्था करतें ! ( जातात. )

## प्रवेश ४ था.

**स्थळ**—मानाजीरावाची गढी.

**पहिला शिपाईः**—थांबा, आपणाला गढींत येऊं देऊं नका अशी ताईसरकारांनी आम्हांला सक्त ताकीद दिली आहे ! आम्हीं हुकुमाचे नोकर ! त्यांच्या हुकुमाप्रमाणें वागणं आमचं कर्तव्य आहे.

**दुसरा शिपाईः**—आपल्याविषयीं आम्हीं अनादर दाखवितों असा मात्र समज करून घेऊं नका ! नोकरीपेशाच असा आहे कीं, कधीं कधीं स्वताच्या मनाविरुद्ध धन्याच्या हुकुमाबरहुकूम वागावं लागतं !

**शिवाजीः**—तुम्हीं आपलं कर्तव्य करीत आहांत ! धन्याचा हुकूम बरोबर पाळणं हेंच सेवा धर्माला योग्य आहे ! त्यामुळं तुमच्याबद्दल आम्हांला राग येण्याऐवजीं आदरच वाटत आहे !

**नेताजीः**—पण हा बंदीचा हुकूम तुम्हांला धाकट्या का मोठ्या ताईसरकारनीं फर्माविला ?

**नीराः**—( प्रवेश करून ) मी त्यांना हुकूम दिला आहे ! त्यांना काय विचारतां ?

**नेताजी**:—आपण इथं नसल्यामुळं त्याना विचारणं भाग पडलं त्यामुळं आपला अपमान झाला असेल तर आम्हांला क्षमा करा !

**नीरा**:—क्षमा मागायला पदरचं थोडंच जातं, बंदीचा हुकूम ऐकून आपण निमुटपणें जाल असं मला वाटलं होतं ! पण नाहीं ! तुम्हीं खोल पाण्यांत शिरूं लागलां ! त्या दिवशींच तुम्हांला गढींत राहण्याची मनाई केली असती, तर आज तुम्हीं इथं आलां नसतां !

**शिवाजी**:—नीराबाई, इतकं आमच्यावर संतापायला आमच्या हातून झालं तरी काय ? शांत व्हा !

**नीरा**:—तुम्हांला गढींत राहूं दिल्यामुळं बाबा आमच्यावर संतापले, बाजीसाहेबांना आमचं करणं नापसंत पडलं, याहून संतापायला दुसरं कारण कोणतं लागतं ?

**नेताजी**:—त्यासाठींच तर आम्हीं आज आलों आहोंत !

**नीरा**:—म्हणजे तुम्हाला स्वप्न पडलं होतं वाटतं ?

**नेताजी**:—नाहीं, स्वप्नसृष्टींत घडलेल्या गोष्टी सत्यसृष्टींत खऱ्या ठरत नसतात ! पण मानाजीरावांना भेटून आमच्या कार्याला त्यांची सहानुभुति मिळवावी, म्हणून आज आम्हीं आलों आहोंत ! तुम्हीं मात्र आमच्या बोलण्याचा विपर्यास केलांत !

**नीरा**:—मी तुम्हांला सांगतें, कीं बाबांची तर भेट होणं शक्य नाहीं आणि तुम्हीं देखील आतां इथं क्षणभर उभें राहूं नका ! बाबा आले आणि तुम्हांला इथं पाहिलं, तर—

**शिवाजी**:—तर काय आमच्यावर रागावतील एवढंच ना ? पण आम्हीं त्यांचा राग एका क्षणांत घालवूं ! मग तर तुम्हांला भिण्याचं कारण नाहीं ना ?

**नीरा**:—तुम्हीं तर कोडगेच दिसतां ! इतकं तुम्हांला विनवून सांगिललं तरी तुम्हांला कसली लाज—

**मीरा**:—( प्रवेश करून ) नीरा, इतका तोंडाळपणा बायकांच्या जातीला शोभत नाहीं ! नीरेच्या तोंडून कांहीं उणा अधीक शब्द निघाला तर तिला क्षमा करा, पण मी आपणाला कोणत्या नांवानं संबोधू ?

**नेताजी**:—माझं नांव नेताजी पालकर !

**मीरा**:—नेताजीराव, तुम्हांला गढींत येऊं देऊं नका म्हणून बाबांनींच आम्हांला सक्त ताकीद दिली, त्याची अम्मल बजावणी आम्हांला करावी लागली !

**शिवाजी:**—तुम्हीं आपलं कर्तव्य बजावलं! पित्राज्ञा पालन करणं मुलाचं कर्तव्य कर्म आहे!

**मीरा:**—मग तुमच्या शिवाजीराजानीं पित्राज्ञा कां मोडली? पादशहाकडे रवाना होत असलेल्या खजिन्यावर हल्ला करून गांवभर लुटारूचा धंदा कां सुरू केला? आणि अशी पुंडाई करणारे तुमचे शिवाजीराजे राष्ट्राचे नेते होणार!

**शिवाजी:**—तुम्हाला कुणी सांगितलं, शिवाजी लुटारूचा धंदा करतो म्हणून?

**मीरा:**—बाजीनीं सांगितलं.

**शिवाजी:**—हे बाजी कोण?

**मीरा:**—बाजी घोरपडे, विजापुरचे मोठे सरदार असून त्यांचें दरबारांत मोठं वजन आहे! शहाजीराजांचा व त्यांचा घरोबा आहे म्हणे!

**नेताजी:**—तुमच्या बाजीसाहेबाचं जर एवढं दरबारांत वजन आहे तर तुमच्या वडिलांना लपून छपून या गढींत दिवस कां काढावे लागतात, आणि शहाजीराजाशीं एवढा घरोबा आहे, तर त्यानीं—त्यांना दरबारांत सरदारी कां मिळवून दिली नाहीं?

**मीरा:**—त्याला कारण तुमचे शिवाजीराजे! त्यांच्या गुणउधळण्यामुळेंच शहाजीराजांना, तसंच बाजी व इतर सरदारांना दरबारांत मान खालीं घालावी लागली? नाहीं तर, मुसलमान अमीर उमरावापेक्षां हिंदु सरदारावरच पादशहाची बहाल मर्जी होती!

**नेताजी:**—तुमच्या बाजीसाहेबावर जर इतकी पादशहाची बहाल मर्जी होती, तर हिंदु स्त्रियांवर होणारे अत्याचार त्याच्याकडून बंद कां केले नाहींत? गोवधाला कां प्रतिबध केला नाहीं? मीराबाई, मानाला हपापलेल्या हिंदु सरदाराच्या हातून आपल्या हिंदु बांधवाचं कल्याण होण्याऐवजी—अकल्याण मात्र होईल!

**मीरा:**—परवां दिवशीं तुमच्या शिवाजीराजानीं म्हणे दरबारला पाठवित असलेला खजिना लुटला—अशा लुटारूपणानें कां ते हिंदुपदपादशाही स्थापन करणार आहेत? मग त्यांचे अनुयायी देखील त्यांचाच कित्ता गिरवणार!

**शिवाजी:**—मिराबाई, तो पैसा कुणाचा होता? आपलाच ना? डोईजड कर बसवून सक्तीनें वसूल केलेला पैसा पादशहाच्या ख्यालीखुशालीसाठीं खर्च होण्यापेक्षां—एकभुक्त असलेल्या गोरगरिबांच्या उपयोगीं पडावा म्हणून शिवाजीराजानीं तो हस्तगत केला—तर त्याला लुटारू म्हणतां येईल का?

**मानाजीः**—( प्रवेश करून ) लुटारू म्हणूं नये तर सज्जन म्हणावं कीं काय त्याला ? आणि त्याचेच गोडवे गायाला तुम्हीं इथें आला वाटतं ? त्याच्या पुंडाईच्या गोष्टी पादशहाच्या कानावर गेल्या आहेत. लवकरच त्याला कैद करणार आहेत असं बाजीसाहेब सांगत होते !

**नेताजीः**—कदाचित् या मोहिमेवर तुमच्या बाजीसाहेबानांच पाठविणार असतील ! त्यांच्याशिवाय असली शौर्याची कामगिरी कोण पत्करणार आहे ?

७ पद—राग—शंकरा—ताल—त्रिताल

**अवगणितां देशा, दास्यपाशा, स्वजन-नाशा, दास्य-रता उमजेना ॥ धृ० ॥ पराम्न सेवनिं गणिति सुखांना ॥ स्वबांधवा दैना ॥ जगिं मिरास धन पदवी लोकां ॥ मानिति सार्थक स्वजीवना ॥ १ ॥**

**मानाजी**—आणि काय त्याच्या पुंडाईला त्यांनीं हातभार लावावा वाटतं ? कुठें पादशाही सत्ता—आणि कुठें शिवाजी—कालचा पोर ? विनाकारण कैदखान्याची हवा खाणार ! त्यापेक्षां शहाजी राजाप्रमाणें इमानें इतबारें पादशहाची सेवा केली तर त्याचं जन्माचं कल्याण होईल.

**शिवाजी**—खरंच मानाजीराव, एवढ्या साध्या गोष्टी देखील शिवाजीला कळूं नये अँ ? पण ज्या अर्थीं त्यांनीं त्यांचा स्वीकार केला नाहीं तर त्याला तसंच कांहीं कारण असलं पाहिजे असं तुम्हांला नाहीं का वाटत ?

**मानाजी**—कारण काय डोंबलाचं असणार ! बापाच्या नांवावर उड्या मारतो झालं ! त्याच्या या पुंडाईला आंतून त्याच्या बापाची फूस असावी असा पादशहाला संशय आला आहे असं बाजीसाहेब म्हणत होते !

**नेताजी**—खरंच तुमच्या बाजीसाहेबांची तारीफ करावी तितकी थोडीच ! कदाचित शहाजीराजांची वजिरी, त्यांचं दरबारांतील वजन त्यांना सहन होत नसेल, म्हणून कदाचित् त्यांनींच शहाजीराजांच्या विरुद्ध पादशहाचे कान फुंकले असतील !

**मानाजी**—तुमची फारच जीभ लांब होत चालली ! खबरदार, बाजीसाहेबांविरुद्ध पुन्हां मुखांतून शब्द काढाल तर ! लुटारू—बेरड कुठले ! मीरा, तुला काय सांगितलं होतं मी ? असल्या डोके फिरू माणसांना आपल्या गढीच्या बाहेर काढायचं

सोडून—उलट तूं त्यांच्याशीं बोलत उभी राहिली आहेस ! तुमच्या हातून झालं नाहीं ते मी आतां करून दाखवितों ! अशा बंडखोर लोकांना मोकळे सोडले तर आम्हांला या गढींत सुखानें घांसभर अन्न देखील खायाला मिळणार नाहीं ! पकडा या हरामखोरांना ! ( शिपाई त्यांना पकडायला येतात. )

**मीरा**—खबरदार—पाऊल पुढं टाकाल तर ! बाबा, असं करणं तुम्हांला योग्य दिसतं का ?

**मानाजी**—योग्य अयोग्य तुम्हां पोरींना काय कळतं ? बाजूला हो. नाहींतर तुलाही त्यांच्या बरोबर कैद करावें लागेल.

**मीरा**—बाबा, ही मीरा मोकळी असेपर्यंत तरी तुम्हांला त्यांना मी कैद करूं देणार नाहीं !

८ **पद**—राग—दुर्गा ताल—एकताल

**कुटिल कपटि नीति कार्य ॥ धर्म लांछना ॥ धृ ॥**
**शस्त्र-रहित नर दुबळा ॥ कवण योजि शस्त्राला ? ॥**
**क्षात्र-धर्म कां लपला ? ॥ यवन दास्यि स्वकुल-नाशि ॥ १ ॥**

**शिवाजी**—मिराबाई, तुम्हीं कशाला उगीच आमच्या कैदेच्या आड येतां ? मनगटाच्या जोरावर यवन सत्तेला झुगारून देण्याचें सामर्थ्य नसलेल्या हिंदु सरदारांकडून—आपल्या निःशस्त्र जातभाईंना कैद करण्या पलीकडे दुसरं कोणतं पौरुष गाजविलें जाणार !

**मानाजी**—कार्यरे, स्वस्थ काय उभे राहिलांत आमच्याकडे पहात ! पकडा यांना.

**शिवाजी**—मानाजीराव, पादशहानें आतांपर्यंत असं तुमचं कोणतं कोट कल्याण केलं आहे, म्हणून तुम्हीं आम्हांला कैद करून दुसरी जहागिरी मिळविणार ? ( भगवे कपडे काढून टाकून ) ज्याला पकडायला पादशहा वाजीसाहेबांना पाठविणार आहे, तो मी हा शिवाजी तुमच्या पुढें उभा आहें—मला कैद करा—पादशहापुढें उभा करा—आणि आपल्या जन्माचं कल्याण करून घ्या ! ( मानाजी, शिपाई, मीरा, नीरा, शिवाजीकडे पहात उभे राहातात. )



मुधोजीः-कोण शिवाजी महाराज !

नाटक. ८५४
३०-१२-३३

# अंक २ रा.

## प्रवेश १ ला

**स्थळ:—महाल.**

**बाजी**—वजीरसाहेब, शिवाजीच्या पुंडाईला आंतून शहाजीची फूस असली पाहिजे, म्हणूनच त्यानं पादशाही मुलुखांत पुंडाई सुरू केली आहे. लवकर जर त्याच्या पुंडाईला आळा पडला नाहीं, तर मग तो डोईजड होऊन बसेल.

**वजीर**—बाजीसाहेब, आपलं म्हणणं खरं आहे. पण मांजराच्या गळयांत घंटा बांधावी कुणी ?

**बाजी**—वजीरसाहेब, आपण जर असे हातपाय गाळूं लागलांत तर मग कुणाच्या हातून हें कार्य होणार आहे ? आपण वजीर आहांत ! दरबारांत आपला दर्जा शहाजीहून मोठा आहे. आपल्या शब्दावर पादशहाचा पूर्ण विश्वास आहे.

**वजीर**—बाजीसाहेब, आपल्या बोलण्याचा रोख माझ्या ध्यानांत आला ! पादशहाजवळ माझं वजन असलं, तरी शहाजी सारखा शूर योद्धा आज गमावून बसायला पादशहा तयार होणार नाहीं. त्याच्या स्वामिनिष्ठेवर पादशहाचा पूर्ण विश्वास आहे !

**बाजी**—पण आपण जर शिवाजीच्या पुंडाईची हकीकत पादशहाला कळविली तर मला नाहीं वाटत कीं, पादशहा आपल्या शब्दावर अविश्वास ठेविल असं ! कर वसूल करून पाठविलेला खजिना शिवाजीनें लुटला, मावळकोंडा व इतर भागांतील पाटील, कुळकर्णी आणि देशपांडे यांना आपल्या बंडांत सामील करून घेऊन, सुभेदाराला कर देण्याचे बंद केलं, आणि दिवसें दिवस प्रत्येक गांव आपल्या मालकीचा म्हणून दोंडी पिटूं लागला, अशा प्रकारचं बंड उभारायला शहाजी कारण आहे असं त्यांना सांगा, म्हणजे पादशहा त्याची योग्य व्यवस्था लावल्याशिवाय राहणार नाहीं.

**वजीर**—शहाजीला दरबारांतून काढून टाकला, तर कदाचित दिल्लीच्या पादशहाच्या पदरीं आश्रय मिळण्याचा संभव आहे ! मग विजापुरावर स्वारी करायला

दिल्लीचा पादशहा कमी करणार नाहीं..! जाणून बुजून सर्पाला चिडवून, दंश करून घेण्यासारखं होईल !

**बाजी**—शहाजीला मोकळा कां सोडा? राजद्रोहाच्या आरोपावर त्याला कैद करावं म्हणजे पुढची भीती राहणार नाहीं !

**वजीर**—पण त्याला कैद करणार कोण ? बाजी, शहाजीला कैद करणं म्हणजे पोरखेळ नव्हे ! त्याच्या शौर्याची तुम्हांला देखील जाणीव असणार ?

**बाजीः**—वजीर साहेब, रक्ताचा सडा न सिंपडतां मी शहाजीला कैद करतों ! आपण तेवढा शहाजीला कैद करण्याचा पादशहाकडून लेखी हुकूम द्या ! पुढचं सर्व मी पाहतों !

**वजीरः**—बरं आहे ! दरबारांत जाण्याची वेळ झाली ! मी जातों आतां, आपण मला संध्याकाळीं भेटा ! पादशहाचा लेखी हुकूम तुम्हांला आणून देतों ! ( वजीर जातो. )

**बाजीः**—पाहिलंत मानाजीराव, नांवाचा वजीर खरा—पण करणीचा कमकुवत-पणा पूर्ण अंगीं भरला आहे ! नशीब अनुकूल म्हणून वजिरी मिरवतो झालं ! शहाजीला कैद करण्याचा लेखी हुकूम माझ्या हातांत पडूं द्या—मग पहा बाजीची करामत !

**मानाजीः**—बाजीसाहेब, खरं पाहिलं—तर विजापुरची पादशाही, हिंदुसर-दारांच्या शौर्यावरच अवलंबून आहे ! आपल्याला शहाजीची जागा मिळाली तर माझी आठवण—

**बाजीः**—विसरेन कसा ? मानाजीराव, माझ्या सुखाच्या वाटेतला शहाजीचा काटा काढून टाकला कीं, पादशहाला बोटावर नाचवितों पहा ! मग काय, मी करीन ती पूर्व ? आपल्या मुलीची मागणी घातली होती हें आपल्याला स्मरत असेल !

**मानाजीः**—मी ती मागणी आनंदानें कबुल करतों; बाजीसाहेब, माझ्या निरेचं भाग्य उदयाला आलं असंच मला म्हणावं लागतं !

**बाजी**—मानाजीराव, आपली संमती मिळाली ! आतां मला आपल्या मुलीची अनुमती मिळविली पाहिजे !

**मानाजीः**—नीरेला कांहीं तुम्हीं परके नाहींत ! तिची मागणी केल्याबद्दल तिला आनंदच वाटेल !

बाजी:—मानाजीरावं, तुमची नीरा आहेच तशी शहाणी! शिवाजीच्या अनुयायांना आपण गळ्यांत येण्याची बंदी केली, हें फार चांगलं झालं! नाहीं तर त्यांच्या डोक्यांत स्वातंत्र्याचं भलतंच वेड भरवून दिलं असतं! लोकरच शहाजीला आणि शिवाजीला कैद करतों, मग त्यांच्या अनुयायाना नेस्तनामूद करायला कितीसा वेळ लागणार! ( जातात. )

## प्रवेश २ रा.

स्थळः—तोरणा.

**शिवाजीः**—नेताजी, भवानी मातेच्या कृपेनं आपण तोरणा किल्ल्यावर स्वराज्य-तोरण उभारलं! शस्त्रास्त्रें विकत घेण्यासाठीं भवानी मातेच्या कृपेनं आपल्याला मोहरा पुतळ्यांनीं भरलेले हंडे, किल्ला खणीत असतांना सांपडले! अर्थात आतां उघड उघड आपण विजापूरच्या बादशहा विरुद्ध स्वातंत्र युद्धाचें रणशींग फुंकलं आहे.

**नेताजीः**—पादशहानें आपल्याला शह देण्यासाठीं कदाचित एखादा अमीर उमराव ससैन्य रवाना देखील केला असेल! शिवबा, तोरणा किल्ल्याची नाकेबंदी इतकी मजबूत केली आहे कीं, सहा महिनेपर्यंत त्याच्याशीं सामना द्यायला आपल्या जवळ धान्याचा भरपूर पुरवठा आहे.

**शिवाजीः**—एवढी आपली तयारी असली तरी पुढं काय हा प्रश्न डोळ्यापुढें उभा रहातोच! तेव्हां वर्षानुवर्षें किल्ल्याला वेढा दिला तरी आपल्याला शत्रूशीं लढतां येईल असा मजबूत किल्ला आपण शोधून काढला पाहिजे.

**नेताजीः**—शिवबा, याहून मजबूत किल्ला म्हणजे पुरंदर.

**शिवाजीः**—शाबास नेताजी, माझ्याही मनांत पुरंदर किल्ल्याविषयीं विचार चालले होते; एकाच ध्येयाच्या माणसांचे देह अनेक असले तरी विचार एकच असतात. आपण सर्वांनीं आपलं सर्वस्व देशाला वाहिलेलं आहे, गोब्राह्मण प्रतिपालनाचें व्रत अंगिकारलें आहे, तेव्हां ध्यानी मनीं स्वप्नीं स्वातंत्र्याचे एकच विचार वसत असल्यामुळें, आपल्या दोघांच्या विचाराची गती एकच झाली त्यांत नवल नाहीं! पण तो किल्ला कसा सर करायचा याचा आधीं विचार केला पाहिजे.

**नेताजीः**—शिवबा, किल्ल्यावरील इत्थंभूत बातमी मी मिळविनों.

**शिवाजी**:—किल्ल्याचा किल्लेदार कोण ? त्याला आपल्या कार्याला वश करून घेतां येईल कां नाहीं, याची विचारपुस आधीं करा.

**नेताजी**:—शिवबा, भवानी मातेची कृपा असल्यावर, कोणती गोष्ट आपल्याला अशक्य आहे ? तोरणा किल्ला हस्तगत होण्यापूर्वीं जो प्रश्न आपल्या पुढं होता, तोच प्रश्न आज आपल्या पुढें आहे ! किल्ल्याच्या किल्लेदाराला आपल्याला वश करून घेतां आलं, तर तोरणा किल्ल्यासारखाच रक्ताचा सडा न सिंपडतां पुरंदर किल्ला हस्तगत करतां येईल.

**शिवाजी**:—नेताजी, तूं आतां पुरंदरच्या रस्त्याला लाग, आणि मी मासाहेबांना भेटण्यासाठीं पुण्याकडे जातो. मासाहेबांचा आशिर्वाद घेऊन, मी देखील पुरंदराकडेच येतों ? ( शिवाजी जातो. )

**नेताजी**:—शिवबाच्या चारित्र्याचं सिंहावलोकन केलं तर त्याला परमेश्वराचा अवतार नाहीं असं कोण म्हणेल ? सज्जनांच्या संरक्षणासाठीं, दुर्जनांच्या संहारासाठीं, परमेश्वराला अवतार घ्यावा लागतो. यवनांच्या जुलमी सत्येचा नायनाट करून गोब्राह्मण प्रतिपालक–हिंदुपद पादशाही स्थापन करण्याकरितां शिवसंभव झाला. शिवबाच्या अंगी असलेलं दैविक गुणच प्रभु अवताराची साक्ष देत आहे ?

९ **पद्**–राग–भीमपलास–ताल त्रिताल.

**जन करूण–हांक परिसतां कानिं ॥ खल दमनिं अवनिं प्रभु संभव घे ॥ धृ० ॥ मातृ–भूमिच्या दास्य विमोचनिं ॥ अवतरे ईश जनांत शिवरुपिं ॥ १ ॥**

## प्रवेश ३ रा

**बाजी**—नीरे, तुझ्या बाबांची संमती घेऊनच, तुझी अनुमती घ्यायला मी आलों आहे ? असल्या भिकार गढीमध्यें राहून, तुझ्या सौंदर्याची हेळसांड होते त्याहून आरसे महालाला तुझ्या सौंदर्यानें अधिक शोभा आली असती ?

**नीरा**—बाजीसाहेब, आज आपण माझ्या सौंदर्याची फारच वाखाणणी करूं लागलांत, इतकी का मी सुंदर आहें ?

**बाजी**—स्त्रियांना स्वतःच्या सौंदर्याची किंमत कळत नाहीं, त्याची पारख रसिक पुरुषच करूं शकतो.

**नीरा**—कांहीं तरी बोलणं झालं ! माझ्यापेक्षां कितीतरी सुंदर स्त्रिया असतील.

**बाजी**—पण माझ्या दृष्टिला–इतर स्त्रियाहून तूं अधीक सुंदर दिसतेस, म्हणूनच तुझी मी मागणी घातली ! नीरे, संसाराचा सारिपाट विस्कटूं नये, म्हणून प्रत्येक पुरुषानें, अगर स्त्रीनें, आपल्या जन्माचा जोडीदार आपल्या गुणरुपाला साजेल असाच शोधून काढला पाहिजे.

**नीरा**—बाजीसाहेब, मी, अजून लग्नाचा विचारच केला नाहीं.

**१० पद**—खमाज ताल—केरवा

**खेळ न भातुकलीचा ॥ मंगल विधि लग्नाचा ॥ धृ० ॥**
**अनुरूप अनुगुण वधूवर जोडा ॥ दुर्लभ लाभ गुणांचा ॥ १ ॥**

**बाजी**—विचार तो कसला करायचा ? तुझं माझ्यावर प्रेम आहे ना ?

**नीरा**—प्रेम म्हणजे कायहो बाजीसाहेब ?

**बाजी**– दुसऱ्याबद्दल स्वताला आपलेपणा वाटणं, याला प्रेम म्हणतात ! नीरे, तूं अजून अगदीं अल्लड आहेस.

**नीरा**—आणि म्हणूनच मला प्रेमाची महती कळत नाहीं.

**बाजी**—मी तें तुला शिकवितों, नीरे, तुला मी आवडतो का ?

**नीरा**—खरं सांगूं कां बाजीसाहेब, आपण मला आवडतां पण–

**बाजी**—मग पण म्हणून कां उगी राहिलीस ? नीरे, बोल, मनांत कांहींच चोरून ठेवूं नकोस,

**नीरा**—आपली कृती मला आवडत नाहीं ! आपण विजापूर दरबारचे सरदार आहांत, आपला दर्जा मोटा आहे, पण आपण आपल्या जातिबांधवांच्या विरुद्ध आहांत.

**बाजी**—कुणी सांगितलं मी हिंदू लोकांच्या विरुद्ध आहे म्हणून ! असलं भलंतच वेड तुझ्या डोक्यांत कुणी भरवून दिलं ?

**नीरा**—आपल्या वर्तनानें ! बाजीसाहेब, आपल्या हिंदु लोकांचा छळ चालला असतांना, हिंदु स्त्रियांना सक्तीनें जनानखान्यांत खेंचित असतांना, त्यांचा प्रतिकार करायचा सोडून पादशहाच्या गुणाचे गोडवे गावूं लागलांत. उलट तुम्हीं हिंदुनांच दोष देऊं लागलांत ?

**बाजी**—नीरे, राजकारणाचं रहस्य तुला कसं कळणार ? त्या शिवाजीप्रमाणें मी

जर पादशाही विरुद्ध बंड करूं लागलों, तर विनाकारण सरदारीला मुकून, तुरुंगाची हवा खावी लागणार! सत्ता त्यांच्या हातांत आहे. सत्ते पुढें शहाणपण नाहीं.

**नीरा**—म्हणून तुम्हीं उघड्या डोळ्यांनीं असलीं अमानुष कृत्यें पहात राहाणार! बाजीसाहेब, आपण पादशहाचे गुलाम झाले आहांत, स्वताच्या पौरुषाला विसरले आहांत, अशा स्वाभिमान शून्य माणसाशीं लग्न करायला कोणती मुलगी तयार होईल?

## ११ पद ( कवाली )

**स्वाभिमाना त्यजुनि सारा—परकियांचे गुलाम झालां ॥ धृ० ॥**
**कोण बाला वरिल कांता—मलिन करि जो कुलयशाला ॥**
**हीन सेवा वृत्ति मानी—स्वसुख अवला-विडंबनेला ॥ १ ॥**

**बाजीः**—नीरे, तुझी जीभ फार लांब होत चालली! असले शब्द दुसऱ्याच्या तोंडून निघाले असते, तर त्याची जिव्हा उपटून काढली असती! स्त्रियानीं राजकाणाच्या घडामोडींत मुळींच लक्ष देऊं नये.

**नीराः**—बाजीसाहेब, स्त्रिया म्हणजे तुम्हीं काय समजतां?

**बाजीः**—पुरुषांच्या मनरंजनांसाठींच परमेश्वरानें स्त्रिजात निर्माण केलेली आहे. पुरुषांचं मन कसं प्रसन्न ठेवतां येईल, याकडेच स्त्रियांनी लक्ष दिलं पाहिजे.

**नीराः**—बाजीसाहेब, स्त्रियांची योग्यता तुम्हीं समजतां इतकी कमी दर्जाची नाहीं! पुरुषांना सन्मार्गावर आणण्यासाठीं परमेश्वरानें स्त्रिजात निर्माण केली आहे.

**बाजीः**—नीरे, बरं तुझं म्हणणं खरं! मला सन्मार्गावर आणण्यासाठीं कां होईना, तूं माझ्याशीं लग्न करायला तयार आहेस तर?

**नीराः**—पण एका अटीवर.

**बाजीः**—ती अट कोणती?

**नीराः**—पादशहाची गुलामगिरी सोडा आणि शिवाजीच्या कार्याला हात भार लावा.

**बाजीः**—हें शहाणपण तुला कोणी शिकवलं? त्या नेताजीनं वाटतं! त्या हरामखोराच्या बंडाला हात भार लावूं? माझ्या सरदारीवर पाणी सोडूं आणि तें केवळ तुझ्या पाणीग्रहणाकरितां! नाहीं, नीरे हें माझ्या हातून कालत्रयीं घडणार नाहीं.

नीरा:—आणि मीही तोंपर्यंत तुमच्याशीं लग्न करणार नाहीं.

बाजी:—नीरे, मी तुला शेवटचें विचारतों आहे कीं तूं माझ्याशीं लग्न करायला तयार आहेस कीं नाहीं ?

नीरा:—तुमच्याशीं ? बाजीसाहेब, तुमच्याशीं लग्न करण्यापेक्षां आजन्म कुंवार राहिलेलं काय वाईट ?

बाजी:—कुंवार राहाणार कां त्या नेताजीचा हात धरून, बंडखोराची साथीदारीण होणार ? नीरे, तूं मला चांगली ओळखीत नाहींस ! या बाजीचा शब्द कधींही खालीं पडला नाहीं अगर पडूं देणार नाहीं; तुझं माझ्यावर प्रेम असो अगर नसो, तुला मी आवडो अगर न आवडो, मी सांगतों म्हणून तरी तूं माझ्याशीं लग्न केलंच पाहिजे.

नीरा:—बाजीसाहेब, कुठल्या घमेंडीत आहांत ? हें विजापूर नाहीं हें लक्षांत ठेवा ! तुमच्याशीं लग्न करायचं तर राहोंच, पण तुमची सावली देखील घ्यायला मी तयार नाहीं.

बाजी:—इतकी घमेंड अँ ! मी मनावर घेईन तर क्षणांत तुमच्या घरादारावरून नांगर फिरवीन. तुझा बाबा माझ्या हातांतलं बाहुलं आहे. तुमचा जीवनक्रम माझ्या दयेवर चालला आहे, हें तुझ्यासारख्या पोरीला कुठून कळणार ? अजून तुला शेवटचं एकदांच विचारतों, तूं माझ्या म्हणण्याला रुकार देतेस कीं नाहीं ?

नीरा:—नाहीं ! नाहीं ! नाहीं ! चला सोडा माझी वाट.

बाजी:—तुला सोडूं ? नीरे, माझ्या घरची वाट तुला मी दाखवितों, म्हणजे या बाजीशीं कसं बोलावं हें तूं शिकशील ! [ तिचा हात धरायला जातो इतक्यांत मीरा येते. ]

मीरा:—हं खबरदार ? बाजी, कुणाचा हात धरतां ? शरम नाहीं वाटत असलं बेशरमपणाचं काम करायला ?

बाजी:—कोण तूं मीरा ? कुणी शिकविले तुला हे पोपटी बोल ? त्या शिव्यानं वाटतं ! नीरेच्या सुखाचा तुला हेवा वाटला म्हणून तूं इतकी माझ्यावर रागावलीस वाटतं ! लाजूं नकोस ! दोन्हीं तलवारी एका म्यानांत ठेवण्याची माझी तयारी आहे.

**मीरा**:—बाजी, तुम्हीं आज भानावर नाहीं खास ! निशा करून तर आलां नाहींत ? मानाजीराव मानकऱ्यांच्या मुली म्हणजे परसांतली भाजी, असं कां तुम्हीं समजतां ?

**बाजी**:—नाहींतर, तुमची योग्यता काय आहे असं तुम्हांला वाटतं ? माझी मदत तुझ्या बाबांना मिळाली नसती, तर तुम्हांला आज पादशहाच्या जनानखान्यांत लोळत पडावं लागलं असतं, लग्नाच्या माना ऐवजीं रखेल्यांचा मानमरातब मिळाला असता, त्याबद्दल माझे आभार मानायचे सोडून मलाच बेशरम म्हणूं लागलांत ? तुम्हांला त्या बंडखोर शिवाजी, नेताजीची फुस असेल ! पण यावेळीं तुम्हीं माझ्या ताब्यांत आहांत.

**मीरा**:—बाजी, मुकाट्यानें तुम्हीं इथून चालते व्हा. नाहींतर मला बाबांना बोलवावं लागेल.

**बाजी**:—मीरा, बाबांना हांक मार ! तुमच्या हांकेला ओ द्यायला ते घरीं थोडेच आहेत; गढींतील सर्व पहारेकऱ्यांना मी कैद केलं आहे, हें मी तुम्हांला सांगायला विसरलोंच ! सर्व परिस्थिती लक्षांत आणा आणि सांगा कीं, आतां दोघांचे हात मी धरले, तर कुणाची छाती आहे तुम्हांला माझ्या हातून सोडवायाची.

**मीरा**:—हा पहा, माझा शील-रक्षक जंबिया माझ्या जवळ आहे, हें तुम्हीं विसरूं नका.

**बाजी**:—मीरा, तुझा जंबिया तुझं शील रक्षण करायला असमर्थ आहे, हें आतांच तुला दाखवितों ! मारा हांका त्या बंडखोरांच्या नांवानें, कदाचित ते पाताळांतून वर येतील.

**मीरा**:—स्त्रियांचं शील रक्षण करण्यासाठीं. शिवाजीचे अनुयायी कुठून कुठें धांवून येतील हें तुमच्या सारख्या शील भक्षकाला कसं कळणार ?

**बाजी**:—असं काय ? पहातों आतां कोण माझा प्रतिकार करायला येतो तो. [ हात धरायला जातो इतक्यांत नेताजी येतो. ]

**नेताजी**:—खबरदार, बाजी, हात आवर नाहींतर हात कलम करायला, ही तारिणी कमी करणार नाहीं. हरामखोरा, लाज नाहीं वाटत स्त्रियांचा हात धरायला ?

**बाजी**:—चूप ! तुझ्यासारख्या बंडखोर--

**नेताजीः**—तुमच्या सारख्या नीच माणसांची कृष्ण कारस्थानें चव्हाट्यावर आणतो असंच ना ? तुला शौर्याची घमेंड असेल तर ती जिरवायला हा नेताजी केव्हांही तयार आहे.

**बाजीः**—तोंड संभाळून बोल ! याचा परिणाम चांगला होणार नाहीं.

**नेताजीः**—तेंच मी तुझ्या प्रत्ययाला आणून देणार आहें ! आर्विधांची थुंकी झेलणाऱ्या, हिंदु स्त्रियांच्या शीलावर घाला घालणाऱ्या नरपशूला, शिवाजीचे अनुयायी काय शासन देतात हें आतांच पहा ! चल उपस तलवार आणि होऊं दे दोन हात !

**बाजीः**—हो पुढं, हुश्शार ! [ दोघेही लढतात व बाजीच्या हातून तलवार पडते, नेताजी त्याच्या छातीला तलवार रोखतो, ]

---

## प्रवेश ४ था.

**सर्जेरावः**—गिरिजा, आतां तूं मला शेंदाड शिपाई म्हणणार नाहींस ना.

**गिरजाः**—कांरे, तुला राग आला वाटतं शेंदाड शिपाई म्हटला म्हणून ? पण तूंच सांग त्या दिवशीं तुझं वर्तन शेंदाड शिपायाचं नव्हतं का ? तलवारीकडे पाहिलं कीं, तुझी पांचावर धारण बसते, मग कां तुला मी शूर म्हणूं !

**सर्जेरावः**—नाहीं तर काय मी भित्रा आहे वाटतं ? भित्रा असतों, तर तारेची सोडवणूक करूं दिली नसती. धाडसाशिवाय वाटतं, तिला सोडण्याचं मीं धाडस केलं ?

**गिरजाः**—त्याला कारण कोण ? मीच ना ? मी जर तुला शेंदाड शिपाई म्हटलं नसतं, तर तुझ्या हातून तसलं धाडस झालंच नसतं.

**सर्जेरावः**—कांहीं कां होईना, पण धाडसाचं कृत्य करून दाखविलं ना ?

**गिरिजाः**—तलवारीकडे पाहिलं तर——

**सर्जेरावः**—आतां नाहीं वाटत तितकी भीती ! तलवार म्यानांतून बाहेर काढली, कीं तुझी मूर्ति डोळ्यापुढं ठेवतों, म्हणजे तलवारीच्या जागीं तूंच दिसतेस

**गिरिजाः**—म्हणजे भागुबाईच कीं नाहीं ? सर्जा, बायकांच्या मागं दडून तलवार गाजविणार तर ? असल्या भित्रेपणामुळेंच हिंदुचा छळ चालला आहे. यवनांची कृती वाईट असली तरी त्यांचं धाडस वाखाणण्यासारखं आहे. अंगांत शक्ती नसली तरी युक्तीनं आपलं काम साधून घेत आहेत.

**सर्जेराव**:--गिरिजा, हिंदुंच्या हातीं सत्ता असती तर त्यानीं देखील धाडसी-पणा दाखविला असता, गुणाचा गौरव करणारे मालक पाहिजेत !

**गिरिजा**:--तसा मालक मिळाला, तर तूं धाडसाचीं कामं करायला तयार आहेस ? तारेचा भाऊ सांगत होता कीं, शिवाजीराजांना धाडसी हिंदु पाहिजे आहेत म्हणून.

**सर्जेराव**:--हे शिवाजी राजे कोण ?

**गिरिजा**:--तुझ्या बाजीचा दुष्मन--

**सर्जेराव**:--म्हणजे ?

**गिरिजा**:--सर्जा, तूं या मावळकोंड्यांत आहेस, पण गांवांत काय चाललं आहे हें तुझ्या गावीं देखील नाहीं ! तारेचा भाऊ मुधोजी शिवाजी राजांना मिळाले आहेत, आणि गांवातील सगळे मावळे मराठे देखील त्यांना मिळाले आहेत.

**सर्जेराव**:--पण त्यांचा उद्देश काय लोकसंग्रह करण्याचा ?

**गिरिजा**:--यवनांच्या छळापासून हिंदुंचं संरक्षण करण्याकरितां, तरुण लोकांचं पथक स्थापन केलें आहे ! जिवाची पर्वा न बाळगितां शत्रूशीं लढेन अशी प्रत्ये-कानें शपथ वाहिली पाहिजे.

**सर्जेराव**:--म्हणजे लढाईसाठीं सैन्याची भरती म्हणेनास ! गिरिजा, लढ-ण्याचें काम कांहीं माझ्या हातून व्हायचं नाहीं ! पण न लढतां, कार्य करण्याचें काम माझ्याकडे लागलं !

**गिरिजा**:--म्हणजे !

**सर्जेराव**:--म्हणजे काय ? ज्या गोष्टी शक्तीनें होत नसतात त्या युक्तीनें सहज होतात. तेव्हां युक्तीनेंच शक्तीचा पराभव करतां येतो.

**गिरिजा**:--म्हणजे तूं मोठा शहाणाच दिसतोस ! शक्तीशिवाय युक्तीचा काय उपयोग होणार आहे ?

**सर्जेराव**--वेडोरे वेडी ! गिरिजा, पुरुषी डोक्यापुढं बायकी डोकं कसं चाल-णार ? तूं आपल्या शहाणपणाची कितीही फुशारकी मारलीस, तरी माझ्या युक्ती पुढें तुला हमेशा हार खावी लागणार.

**गिरिजा**--तुला तलवार गाजवितां येत नाहीं म्हणून तूं युक्तीचं नांव पुढं करतोस ! पण शक्ती शिवाय युक्ती नेभळीच पडणार, याहून असं उघड का सांगत आहींस, कीं मी बायकी पुरुष आहे म्हणून, म्हणजे वादच मिटला.



गिरिजा —मी लग्नच करणार नाही.

## १२ पद–राग कर्नाटकी ताल–त्रिवट

**साहस ना रणिं यश ना ॥ भीरुता करि निर्बला सबलां ॥ धृ० ॥**
**लाभलें यशतें कुणा ? ॥ योजितां जरि यंत्रणा ॥**
**करि शक्ति युक्ति बल प्रलयकाल अवनितिला ॥ १ ॥**

**सर्जेराव**—गिरिजा, उगाच वितंडवाद मांडु नकोस ! माझं म्हणणं बरोबर आहे, हें मी आतां तुझ्याकडून कबूल करून घेतों पहा ! समज, पादशहाच्या सैन्यानें मावळकोंड्याला वेढा दिला आणि गांवांत शिवाजीच्या तरुण पथकांत शेंपन्नास मावळे आहेत, मग तूंच सांग, या मूठभर मावळ्यांच्या शक्तीनं, पादशाही सेना–समुद्राला मागे हटवितां येईल का ?

**गिरिजा**—नाहीं ! हें मी कबूल करतें ! मग तुझ्या युक्तीनं काय उजेड पडणार आहे ?

**सर्जेराव**—आस्ते ! आस्ते ! एकदम अंगावर येऊं नकोस ! त्यावळीं युक्तिनेंच कार्य साधतां येईल.

**गिरिजा**—सांगशील कीं नाहीं ! कां उगीच तोंडाची तोफ सोडतोस ?

**सर्जेराव**—तोंडाच्या तोफेनं हृदयाला धक्का बसेल, पण तोफेच्या तोंडीं दिलं तर बोलायला तोंडच राहणार नाहीं !

**गिरिजा**—बोलण्याच्या शिताफीनं मला चकविण्याचा प्रयत्न करशील तर मी फसणार नाहीं.

**सर्जेराव**—तुला फसवून मला माझ्या जन्माची फसवणूक करून घ्यायची नाहीं. गिरिजा, शत्रूला चकवून वेढा उठवून त्यांची कशी फसवणूक करायची हें तुला सांगतों. वेढा दिला आहे ! वेढा फोडण्याची अगर दोन हात करण्याची शक्ति नाहीं, तेव्हां हातीं पांढरं निशाण घेऊन शत्रूच्या गोटांत जावं, तह करण्याचा बाणा करावा म्हणजे आपोआपच शत्रूच्या शक्तीला ढिलेपणा येतो. भावी जयाच्या आनंदांत, शत्रूची सेना गाफील असते, त्यावेळीं चारी बाजूनीं हल्ला केला कीं, चारी मुंडे चीत.

**गिरिजा**—सर्जा, त्याला देखील धाडस लागतं ना ? तूं शिवाजीच्या तरुण पथकांत नांव नोंदलंस, तर तुला युद्ध शिक्षण मिळेल ?

**सर्जेराव**—थांब ! मला एक युक्ती सुचली आहे. तरुण पथकांत नांव नोंदून न होणारं काम माझ्या युक्तीनं साध्य होणार आहे.

**गिरिजा**—सांग सर्जा, तुला काय युक्ती सुचली आहे ती !

**सर्जेराव**—पण एका अटीवर.

**गिरिजा**—कसली अट ? तुझ्या अटी सांभाळतां सांभाळतां माझ्या नाकीं नवूं येणार !

**सर्जेराव**—दोघांची एकी झाली कीं, मग नाकीं नवूं येणार नाहीं !

[ कानांत सांगतो. ]

**गिरिजा**—चल चावट कुठला.

**सर्जेराव**--गिरिजा, प्रेमाचं पाठबळ असल्यावर वाटेल तें धाडस करायला हा सर्जा मागं पुढं पहाणार नाहीं !

**गिरिजा**--एवढं साहस करायला तूं तयार झालास तर--

**सर्जेराव**--तर काय ?

**गिरिजा**--तुझी अट मला कबूल आहे.

१३ पद ( गज्जल )

**साहसि प्रियकर झाला, गुणाला न मोला ॥**
**पंच प्राणा समर्पीति बाला ॥ धृ ॥**
**सुखाला न सीमा ॥ नसेचि उपमा ॥**
**देह झिजावा, देश सजावा, मनिं धरूनिया ध्येयाला ॥ १ ॥**

---

## प्रवेश पांचवा.

**मुधोजी**:—हिरोजी, ऐक–तारेला पळवून नेणाऱ्या नराधमाचं नांव ऐक, म्हणजे तुझी खात्री होईल कीं, यवनापेक्षां हिंदु म्हणविणारे बाजीसारखे पादशहाचे सरदारच, हिंदु–स्त्रियांच्या पातिव्रत्यावर घाला घालायला तयार होतात.

**हिरोजी**:—काय ! बाजी घोरपड्यानें तारेला पळवून नेली होती ? अरेरे ! हिंदुच हिंदुचे शत्रू !

**मुधोजी**:—असे नुसते निश्वास सोडून काय होणार आहे ! आधींच महागाईनं लोक हवालदील झालेले, करांच्या ओझ्याखालीं दडपून गेलेले, तशांत हिंदुनींच

हिंदुचा उच्छाद मांडलेला पाहून स्वस्त बसणें, म्हणजे कांहीं दिवसांनीं स्वतःच्या सर्वस्वाचा नाश करून घेण्यासारखं होय !

**हिरोजीः**—आधीं या हरामखोर बाजी घोरपड्याला हुडकून काढला पाहिजे.

**मुधोजीः**—शिवाजी राजांनीं तोरणा किल्ला हस्तगत केल्यामुळें, पादशहा चिडून गेला आहे, तशांत मावळकोंड्याच्या व इतर खेड्यापाड्याच्या पाटील, कुळकर्णी, देशपांडे यांनीं कर वसुली न पाठविल्यामुळें, मावळकोंड्यावर व खेड्यापाड्यावर वाटेल तशी जुलमी सत्ता सुरू केल्याशिवाय राहाणार नाहीं !

**हिरोजीः**—तशा प्रसंगाला तोंड देण्यासाठीं आपल्या लोकांची जय्यत तयारी असली पाहिजे.

**मुधोजीः**—हिरोजी, मावळे–मराठ्यांच्या मदतीनेंच आपल्याला शहाला शह देतां येईल ! जुलमी सत्तेमुळेंच लोकांच्या मनांत देशसेवेचे विचार जागृत होतात, आणि स्वातंत्र्याची महत्वाकांक्षा वाढते ! नाहीं तर आहे त्यांत सुख मानीत असतात.

**हिरोजीः**—पण हाताची सगळींच बोटं कांहीं सारखीं नसतात ! गांव तिथं म्हारवाडा असायचाच ! मावळकोंड्यांतील सारेच लोक आपल्याच ध्येयाचे असतील असं सांगतां येणार नाहीं, कांहीं पादशहाचे कैवारी असणारच !

**मुधोजीः**—म्हणून तर परक्यांना फावतं ! हिरोजी, अशा वृत्तीच्या माणसांना आधीं जगांतून नाहींसे केले पाहिजेत ! शिवाजीराजांना पकडण्याबद्दल ५००० पांच हजार मोहरा पादशहानें बक्षीस लावले आहेत.

**हिरोजीः**—या आमीषाच्या जाळ्यांतच आपले कित्येक जातिवंत हिंदु अडकले जातील ? ( इतक्यांत शिवाजी गोसावी वेषांत येतो. )

**शिवाजीः**—भाई, आपका नशीब खुल जायगा ! मै एक गरीब फकीर हूं ! आपका हातसे दो पैसा मिलेगा तो अल्ला दुवा देगा ! आपका हात तो बताव !

**मुधोजीः**—गोसावीबुवा, आपण हिंदु फकीर असून आपण आमच्याशीं मुसलमानी भाषेंत कां बोलतां ? मराठी भाषेचा इतका कंटाळा आला आहे का आपल्याला ? का लाज वाटते बोलायला ?

**शिवाजीः**—ही राजभाषा आहे ! ही भाषा बोलल्यामुळें हिंदुफकीरांना कुठेंही जायला मज्जाव नसतो ! या भाषेवरच अमीर उमरावांकडून पोटासाठीं पैसा मिळवितां येतो, मराठी भाषेमुळं पैसा मिळण्याऐवजीं धक्के मात्र खावे लागतात.

**हिरोजी**—म्हणून तुम्हीं मराठी भाषेचा त्याग केला वाटतं ?

**शिवाजी**—आमच्या हिंदु भाईकडून, हिंदु फकीरांना मदत मिळाली असती तर कशाला दुसऱ्या भाषेचा स्वीकार केला असता ! तें जाऊं द्या ! पण तुमचा हात तर दाखवा !

**मुधोजी**—पोटासाठीं ही देखील विद्या तुम्ही संपादन केली वाटतं ? भविष्यावर हवाला ठेवून तुम्हीं हात पाहून भविष्य वर्तविणार वाटतं !

**शिवाजी**—मी कशाला माझी स्तुती करूं ! प्रत्यक्षाला प्रमाण नको ! तुम्ही हात दाखवा तर खरा ! ( मुधोजीचा हात पाहतो. ) तुमचे हालाचे दिवस संपत आले आहेत, थोडक्याच दिवसांत—

**मुधोजी**—आमच्या मावळकोंडयावर संकट येणार हेंच ना ?

**शिवाजी**—नाहीं, थोडक्याच दिवसांत तुम्हांला पैसे मिळणार आहेत.

**मुधोजी**—गोसावी बुवा, पैसे मिळणार आहेत ! कुठून ?

**शिवाजी**—तेंच तुम्हांला मी सांगणार आहें ! पण—

**मुधोजी**—पण म्हणून कां थांबलांत !

**शिवाजी**—थोडं साहस केलं पाहिजे, मग पहा—पैसा पायांपाशीं येईल, आहे तुमची तयारी ?

**हिरोजी**—सांगा, ऐकुं द्या तर खरं कसलं धाडस तें !

**शिवाजी**—तुम्हीं ओळखतां कां शिवाजीला ?

**मुधोजी**—होय ! पण त्यांचा याच्याशीं काय संबंध !

**शिवाजी**—त्याच्यामुळेंच तुम्हांला पैसा मिळणार आहे.

**मुधोजी**—म्हणजे ?

**शिवाजी**—दुसरं काय ? शिवाजीला पकडून देईल त्याला ५००० हजार मोहरा देण्याच पादशहानें बक्षीस लावलं आहे, हें तुम्हांला माहीत आहे का ?

**हिरोजा**—पुढं ?

**शिवाजी**—पुढं काय ? यानीं त्याला पकडून द्यावं—म्हणजे त्यांना ५००० पांच हजार मोहरा व दरबारांत सरदारकी देखील मिळेल.

**मुधोजी**—काय म्हणालांत शिवाजीला पकडून पादशहाकडे पाठवावं ?

**शिवाजी**—होय ! त्यांत काय झालं ! तुमचं काय नुकसान होणार आहे त्यामुळं ? पैसा मिळेल, मान मिळेल, आणि सरदारीही मिळेल.



रामदास: जयजय रघुवीर समर्थ !

**मुधोजी**—गोसावड्या, तोंड सांभाळुन बोल ! शिवाजी राजांना पकडण्याचा उपदेश तूं करतोस ? यावरून तूं पादशहाचा हेर असला पाहिजेस.

**शिवाजी**—मी कशाला खोटं बोलूं ? मी पादशहाचा हेर नाहीं ! तुमच्यासारखाच हिंदू आहे.

**मुधोजी**—तूं हिंदु असतास तर कमअस्सल हिंदुसारखा शिवाजीला पकडण्याचा उपदेश केला नसतास ! यवन पत्करले, पण तुझ्या सारखे कमअस्सल हिंदूचें तोंड देखील पाहायला नको ! जा चालता हो इथून, नाहींतर उगीच प्राणाला मुकशील !

**शिवाजी**—प्राणाचा मोह माझ्या सारख्या घर ना दार अशा फकिराला कुठून असणार ? दैव देतं आणि कर्म नेतं म्हणतात तें असं ! चालत आलेल्या लक्ष्मीला लाथाडुं नका ! अजूनही माझ्या उपदेशाप्रमाणें वागा, म्हणजे तुमचं जन्माचं कोटकल्याण होईल.

**मुधोजीः**—हरामखोरा ! गोसावी म्हणून आतापर्यंत तुझ्या शब्दाकडे कानाडोळा केला ! पण नाहीं ! तुझ्यासारख्या हरामखोराला जिवंत सोडला, तर दयेचा दुरूपयोग केल्यासारखा होईल ! घे देवाचं नांव आणि मरायला तयार हो !

**शिवाजीः**—देवाचं कशाला ? तुमच्या शिवाजीचंच नांव घेतों म्हणजे कदाचित् माझा अपमृत्यु टळेल !

**मुधोजीः**—चल आटप लौकर ! जय भवानी—[ तलवारीनें वार करणार इतक्यांत शिवाजी गोसाव्याचा वेष टाकतो. ] कोण शिवाजीमहाराज—( आश्चर्यानें हिरोजी व मुधोजी शिवाजीकडे पाहतात. )

ग्रंथ संग्रहालय
धा. नाटक नं. ५५१
30-12-33

# अंक ३ रा

## प्रवेश १ ला.

स्थळः—महाल.

**जिजाबाईः**—शिवबा, तूं पादशहाशीं राजकारणी डाव खेळतो आहेस. एकेक खेडं, एकेक गांव, आणि एकेक किल्ला आपल्या ताब्यांत घेतोस खरा पण त्यामुळं तुझा जीव किती धोक्यांत आहे याची तुला जाणीव आहे का ?

**शिवाजीः**—आई, मी कांहीं नवीन डाव खेळत नाहीं. बाबानीं अनेक राजकारणी डाव खेळून, विजापुरची पादशाही चिरस्थावर केली, तेच डाव खेळून मी हिंदुपदपादशाहीचा पाया चिरस्थावर करीत आहे ! आई, माझ्या एकट्या जीवासाठीं तुझा जीव खालीवर होत आहे, तर माझ्या खांद्याला खांदा भिडवून लढणाऱ्या अनेक मावळे मराठ्यांचे जीव धोक्यांत असलेले पाहून, त्यांच्या आयाबहिणीच्या जिवाला काय वाटत असेल ?

**जिजाबाईः**—शिवबा, पण तूं कुणाशीं डाव खेळतो आहेस याचा आधीं विचार कर ! तुला आंतून राजांची मदत असावी, असा पादशहाचा ग्रह झाला आहे !

**शिवाजीः**—पादशहा ! आई, पादशहाचा असा भलताच ग्रह करून द्यायला आपले हिंदुच कारणीभूत असले पाहिजेत. पादशहा म्हणजे एक ,विलासी प्राणी ! त्याच्या विलाससुखांत जोपर्यंत कमतरता पडली नाहीं, तोपर्यंत राज्याच्या व्यवस्थेकडे तो ढुंकून देखील पाहणार नाहीं.

**जिजाबाईः**—पादशहा कदाचित राजांना तुझ्या कृत्याबद्दल जबाबदार धरण्याचा संभव आहे ?

**शिवाजीः**—पुत्राच्या अपराधाबद्दल पित्याला जबाबदार धरणं हा विजापूरच्या दरबारांतील न्याय असेल, पण त्याला हा शिवाजी अन्यायच म्हणणार.

**जिजाबाईः**—शिवबा, पादशाही शब्दाला मान डोलविणारे हिंदु सरदार जोपर्यंत दरबारांत आहेत, तोपर्यंत त्यानं दिलेल्या न्यायाला अन्याय असं कोण म्हणेल ?

**शिवाजीः**—मी म्हणतों ! विजापुरांत असले अन्याय हरघडी होत आहेत,

त्या अन्यायांचा प्रतिरोध करण्यासाठीं, मी विजापुर पादशाही विरुद्ध रणशिंग फुंकलं आहे.

**जिजाबाईः**—शिवबा, पादशाही सेनेपुढं तुझ्या मूठभर मावळ्याचं काय चालणार आहे ? तुझं करणं जरी न्यायी असलं, तरी पादशहाच्या दृष्टीनं अन्यायीच ठरणार आहे ?

**शिवाजीः**—मग मी काय करूं म्हणतेस आई ! देशाला दास्यापासून मुक्त करण्यासाठीं स्वीकारलेलं व्रत सोडून, पादशहाची गुलामगिरी पत्करूं ?

**जिजाबाईः**—गुलामगिरी पत्करायला मी तुला कसा उपदेश करीन ? तुझं एकेक धाडसी कृत्य पाहिलं, तर तुझी आई म्हणवून घेण्यांत मला अभिमान वाटतो. पण त्या पायीं तुझ्यावर येऊं पाहणाऱ्या भावी संकटाचं चित्र डोळ्यापुढं उभं राहिलं कीं, जीव वेडावून जातो ?

**शिवाजीः**—आई, संकटाच्या भयानें ध्येय सोडणं म्हणजे नामर्दपणाचं लक्षण आहे. आई, तूंच मला बाळपणापासून स्वातंत्र्याचं बाळकडू पाजलं, त्यामुळेंच मला गुलामगिरीचा वीट आला आणि स्वातंत्र्याची आवड उत्पन्न झाली ! बाबांची जी ह्यांजी कृती असह्य झाल्यामुळें विजापुर सोडून पुण्याला आलों ? दादोजींनीं मला स्वातंत्र्याचा मुळमंत्र दिला आणि त्या मंत्राचा धडा मी आतां गिरवीत आहे, त्यामुळें पादशहा जर बाबांना जबाबदार धरीत असेल तर त्यांचा मूर्खपणा नव्हे कां ?

**जिजाबाईः**—पण शिवबा, राजांच्या जिवाला काय वाटेल. उतारवयांत पादशहानें जर त्यांचा अपमान केला आणि कदाचित त्याना कैद केलं तर——

**शिवाजी**—तर त्यांना मी सोडविन ! बाबांच्या केसाला धक्का लागला, तर विजापुरच्या तक्ताला धक्का बसल्याशिवाय राहणार नाहीं ?

**जिजाबाई**—त्याबद्दल माझी खात्री आहे, पण [ रामदास येतो. ]

**रामदासः—समर्थाचिया सेवका वक्र पाहे ॥**
**असा सर्व भूमंडळीं कोण आहे ॥**
**जयाची लिला वर्णिती लोक तीन्ही ॥**
**नुपेक्षी कदा रामदासाभिमानी ॥ धृ० ॥**

जयजय रघुविर समर्थ.

[ जिजा व शिवाजी पायां पडतात. ] जिजा, शिवबाच्या उत्साहाचा हिरमोड करूं नकोस ! त्याच्या हातून हिंदुपदपादशाही स्थापन व्हायची आहे ! सत्याचं कवच धारण करून, असत्याचं उच्चाटण करणंच योग्य नाहीं कां ! तुला मातृप्रेमामुळें शिवबाबद्दल काळजी वाटणं अस्थानी नाहीं ?

**जिजाबाई**—महाराज, शिवबाला निरूत्साही करण्याची माझी इच्छा नाहीं, त्याचं लहान वय--

**रामदास**—म्हणून त्याच्याबद्दल काळजी वाटते असंचना ? वयाबर काय आहे ? हा सिंहाचा छावा आहे, दातीं कधींच तृण धरणार नाहीं ! शहाजीच्या पत्राचा तुझ्या मनावर परिणाम झाला आहे. शिवबाच्या पुंडाईबद्दल पादशहानं त्याला जबाबदार धरला आहे !

**जिजाबाई**--होय महाराज, आपण अंतरसाक्षी आहांत, मी आपणाला सांगितलं पाहिजे आहे असं नाहीं ?

**रामदास**—जिजा, तुझ्या हृदयांत पतिप्रेम आणि पुत्रप्रेमाचं घनघोर युद्ध चाललं आहे, पण पुत्राला सन्मार्गाचा उपदेश करणं आईचं कर्तव्य ठरत असतं ?

**जिजाबाई**--म्हणूनच विजापुर सोडून मी पुण्याला आलें.

**रामदास**--जिजा, ज्या स्वयंस्फुर्तीनं तूं नऊ मास पूर्ण झाले असतां देखील मोगलांच्या सेनेशीं लढत होतीस, तीच स्वयंस्फूर्ती आज शिवबाच्या अंगात संचारली आहे, म्हणून त्याच्या हातून अनेक धाडसी कृत्यं होत आहेत.

**जिजाबाई**--तुझा पुत्र " छत्रपती " होईल म्हणून भवानीमातेनं दिलेल्या आशिर्वादाचं मला विस्मरण पडलं नाहीं !

**शिवाजी**—आई, त्यामुळंच आजोबाचं आणि बाबाचं वैरत्व वाढलं, आणि तुला आजोबापासून त्रास झाला ! आई, भवानी मातेनं दिलेला आशिर्वाद फलद्रुप होण्याचा योग जवळ आला आहे !

**रामदास**---शिवबा, तुझ्या स्वराज्य स्थापनेचं कार्य सुलभ व्हावं, याकरतां समर्थांची लेकरं गांवोगांवी, शहरोशहरीं लोकांना स्वराज्याचा मंत्रोपदेश करीत आहेत !

**शिवाजी**–महाराज, आपण माझे गुरू ! शिष्याची कर्तबगारी वाढायला गुरूच कारणी भूत होतो !

**रामदास**—पण तुझ्या कार्याची पुर्तता झाल्यावर, "छत्रपती" म्हणून राज्यारोहण झाल्यावर, माझी गुरुदक्षिणा द्यायला मात्र विसरूं नकोस !

**शिवाजी**—महाराज, माझी राजा होण्याची इच्छा नाहीं, हिंदूची गुलामगिरींतून मुक्तता झाली कीं, माझं कार्य संपलं ! गुरुदक्षिणा म्हणून राज्यच आपल्याला समर्पण करीन !

**रामदास**—शिवबा, समर्थांच्या लेकरांना राज्याचा लोभ नाहीं, संपत्तीची हांव नाहीं, पण समर्थपंथीयाचं नांव, तुझ्या नांवाबरोबर चिरस्मरणीय असावं म्हणून तुझ्या राज्याचें निशाण-भगवट वस्त्राचं असावं एवढीच गुरुदक्षिणा मी तुझ्या जवळ मागणार आहे !

**शिवाजी**—महाराज, आजपासून प्रत्येक ठिकाणी मराठ्यांचं भगवें निशाण फडकत राहील !

**रामदास**—शिवबा, आमचं राहणं एकच ठिकाणी नसतं, ज्यावेळीं तुला, मला भेटण्याची इच्छा होईल, त्यावेळीं तुझ्या जवळच आहे असं समज ! संकटपरंपरा कांहीं सांगून येत नाहीं, स्वराज्य स्थापनेच्या मार्गांत किती तरी संकटं उत्पन्न होतील, हिंदूच हिंदूचे वैरत्व साधतील, पण त्यावेळीं मनोधैर्यानेंच त्यांना तोंड द्यायला कचरूं नकोस एवढाच माझा उपदेश सदैव ध्यानांत ठेव, म्हणजे सर्व संकटांतून पार पडून, रायगडावर तूं स्वराज्याची स्थापना करशील ! श्रीराम समर्थ आहे. काळजी करूं नकोस, जयजय रघुवीर समर्थ. रघुवीर समर्थ. [ जातो. ]

---

## प्रवेश २ रा

**स्थळः**—बगीचा.

**नीराः**—फुलं वेंचायला म्हणून मी बागेंत आलें खरी, पण एक फूल देखील माझ्या परडींत नाहीं ! स्वतंत्रपणानं वेलीवर नाचत खेळत असलेलीं फुलं खुडतांना, माणसांच्या मनाला आनंद वाटत असला, तरी फुलांच्या मनाला काय बरं वाटत असेल ? पारतंत्र्याच्या परडींत सक्तीनं कोंडून ठेवतांना त्यांचं स्वातंत्र्य आपण हिरावून नेतों आहोंत, ही भावना माणसांच्या मनाला शिवत नाहीं, हा विचार आला कीं, माझे हात जागच्या जागीं खिळून राहतात !

## १४ पद—कवाली

**पुष्पकलिका जन्म घेती रंजवाया मानवांना ॥**
**स्वार्थ नाहीं, गर्व नाहीं, नाहिं थारा भावनांना ॥**
**देह आपुला अर्पुनीयां लाजवीति मानवांना ॥ धृ० ॥**
**धर्म नाहीं, देश नाहीं, कालमाना लाजही ना ॥**
**पाहती ना पापपुण्या स्वार्थ आपुला साधितांना ॥**
**वंद्य जगतीं कोण ठरती हेंच कोडें मानवांना ॥ १ ॥**

देशाची दैन्यावस्था नाहींशी करण्याकरितां—हिंदूना दास्यांतून मुक्त करण्याकरितां—शिवाजी राजे आपल्या सर्वस्वावर लाथ मारून—देशाचे फकीर बनले, नेताजी—मुधोजी हिरोजीसारखे जीवाला जीव देणारे अनुयायी त्यांना मिळाले, तर बाजीसारखा हिंदु सरदार, परक्यांचा बंदा गुलाम होऊन पारतंत्र्यांत स्वतांच सुख मानूं लागला. त्यांच्याच शिकवणीनं नेताजींना गढींत येण्याची बाबानीं बंदी केली, त्यांना मा हवं तसं टाकून बोललें, पण त्यांनीं तें बोलणं मनावर घेतलं नाहीं, उलट बाजीशीं दोन हात करून आम्हांला उपकारानेंच लाजाविलं ! [ इतक्यांत मीरा येते. ]

**मीरा**:—कुणी लाजविलं ? नीरे, इथं तर कुणी दिसत नाहीं !

**नीरा**:—त्यांनीं लाजविलं—

**मीरा**:—ते ग कोण ?

**नीरा**:—जसं कांहीं तुला ठाऊकच नाहीं !

**मीरा**:—तूं सांगितल्या खेरीज कसं कळणार ?

**नीरा**:—कळायचं काय त्यांत ? परवांच्या दिवसांची आठवण कर म्हणजे सर्व कांहीं कळेल !

**मीरा**:—नीरा, परवांच्या दिवसाच्या प्रसंगानं बाजीच्या काळ्याकुट्ट अन्तःकरणाची—ओळख चांगली करून दिली. त्याच्यापासून आतां आपण चार पावलं दूर राहिलं म्हणजे झालं.

**नीरा**:—आणि दुसऱ्या कुणाची ओळख झाली नाहीं वाटतं ? गरज सरो आणि वैद्य मरो, असंच तुझं वर्तन दिसतं ! आपल्या दोघांचा हात धरण्याच्या वेळीं ते आले नसते तर आपल्यावर कोणता प्रसंग आला असता याची आठवण आहे कां तुला ?

**मीरा:**—हो ! मला चांगली आठवण आहे त्याची ! नेताजीच्या उपकाराची आठवण विसरणं म्हणजे उपकार अपकारानं फेडण्यासारखं होईल !

**नीरा:**—मी देखील तेंच म्हणतें ! त्यांच्याबद्दल मी बोलत होतें इतका वेळ ! त्याविषयीं मी त्यांना टाकून बोललें. पण त्यानीं मला उपकारानेंच लाजविलं !

**मीरा:**—अस्सं ! अस्सं ! मला तर उमजच पडला नाहीं, इतका वेळ तुझ्या बोलण्याचा ! कधीं कधीं तुझ्या तोंडाळपणाला सुमारच नसतो !

**नीरा:**—पण आतां ते आले तर त्यांची क्षमा मागितल्याखेरीज माझ्या मनाला समाधान वाटणार नाहीं !

**मीरा:**—मला नाहीं वाटत कीं, नुसत्या क्षमा मागण्यानं त्याच्या मनाचं समाधान होईलसं—पण इतका वेळ काय करीत होतीस ! परडींत तर एक फुल देखील नाहीं. तिन्सांज झाली—नाहीं तर—परवांसारखं—बाजीसारख्या डोंबकावळयाच्या तावडींत सांपडायचीस ! त्यावेळीं नेताजी तरी आले सोडवायला—

**नीरा:**—ताई, तूंच म्हणत होतीस कीं, शिवाजीचे अनुयायी कुठून कुठें धऊन येतील याचा नेम नाहीं म्हणून ?

**मीरा:**—पण संभाळून—लवकर ये म्हणजे झालं ! बाबा येतील इतक्यांत मी जातें पुढं ! [ जाते. ]

**नीरा:**—खरंच मी किती वेडी !

**१५ पद**-राग-पटदीप-ताल-झपताल

**मन-रमण कां नये ? हृदय हें व्याकुला, सहवास**
**क्षणमात्र, करि मुदित बालिका ॥ धृ० ॥**
**शशिकांत नभिं उदय ॥ करि कुमुदिनि विकास ॥**
**सुखिदंग नवरंगिं ॥ ही जादुगारि कां ? ॥ १ ॥**

अशी मी आणखी किती वेळ उभी राहिलें तरी [ नेताजी येतो, ] कोण—नेताजीराव ?

**नेताजी:**—माफ करा ! आपण इकडे आहांत असं मला कळलं असतं तर मी इकडे येण्याचं धाडस केलं नसतं—

**नीरा:**—धाडसामुळंच सद्गुणाची पारख होते ! नाहीं तर सद्गुणाचा सहवास दुसऱ्याला भासत नसतो.

**नेताजीः**—पण बंडखोरांचं धाडस, दुष्कृत्यांत गणलं जातं !

**नीराः**—भलतंच कांहीं तरी ?

**नेताजीः**—भलतंच कसं ? नाहीं तर आम्हांला त्या दिवशीं गढींत येण्याची बंदी केली नसती !

**नीराः**—त्या दिवशीं माझ्या हातून चूक झाली खरी ! आपल्या उदार हृदयाची–सौजन्याची ओळख नसल्यामुळं, आपल्याला गढींत येण्याची बंदी केली ! बाजीनं शिवाजीराजांच्या सत्कार्याचा विपर्यास करून–बाबांना सांगितल्यामुळं–त्यांची दिशाभूल झाली होती–पण आतां त्यांचे डोळे उघडले–सज्जनाचं सौजन्य दिसलं–दुर्जनांचा दुष्टपणा कळून आला !

**नेताजी**—नीराबाई, आमच्याबद्दल तुमच्या बाबांचा झालेला गैर समज दुर झाला हें ऐकून मला आनंद वाटतो ! पण हें स्मशान–वैराग्य तर नाहींना ?

**नीरा**—नेताजीराव, आमचे बाबा कांहीं इतके वाईट अन्तःकरणाचे नाहींत हो !

**नेताजी**—माझ्या बोलण्याचा अर्थ तसा नव्हता ! तुमच्या बाबांबद्दल आमचा वाईट ग्रह झाला असता, तर त्यांची भेट घेण्यासाठीं त्यादिवशीं आम्हीं आलोंच नसतों.

**नीरा**—पण बाबानीं बाजीच्या सांगण्यावरून आपला अपमान केला. शिवाजी-राजांना कैद करण्याला देखील प्रवृत्त झाले होते म्हणून आपल्याला राग आला असेल ? कदाचित आमच्याबद्दल तिरस्कार देखील वाटत असेल !

**नेताजी**—नीराबाई, मानापमानाचं गाठोडं झुगारून देऊनच आम्हीं देशसेवेचं व्रत अंगिकारलं आहे. तुमच्या दृष्टीनं ठरलेले आम्हीं बंडखोर मानापमानाकडे पाठ करून, आपलं कार्य साधण्याकडे टपून बसलेले असतों.

**नीरा**—एकंदरींत आपण कार्यसाधू दिसतां तर ? पण आपलं कार्य साध-तांना आपणाला कांहीं अडचणी आल्या तर—

**नेताजी**—येणाऱ्या अडचणी युक्तीनं नाहींशा करून, आपलं कार्य अगदीं मनासारखं साधून घेणं ह्यांतच खरा पुरुषार्थ आहे. मनांत आणलेलं कार्य ज्याच्या हातून सिद्धीस जात नाहीं. तो माणूस कसला ?

**नीरा**—पण कांहो नेताजीराव, तुमचीं मनांत योजलेलीं कार्यं जेव्हां सिद्धीस जात असतात, त्यावेळीं तुम्हांला मोठा आनंद होत असेल नाहीं ?

**नेताजी**—कां नाहीं आनंद होणार ? मनासारखं कार्य घडून आलं म्हणजे कुणालाही आनंद होणं साहाजिकच आहे.

**नीरा**—मनांत आनंद झालेला असून देखील, तो बाहेर न दाखविणारी माणसं जगांत असतील नाहीं ?

**नेताजीः**—नसायला काय झालं ? असल्या तऱ्हेचीं माणसं निराळींच असतात ! आणि त्यामुळं त्याचं आणि माझं कधींच जमत नाहीं. माझ्यासारख्या लढाई पेशाच्या माणसाला शस्त्राचे डावपेंच चांगले करतां येतात ! परंतु हे फसवा फसवीचे डावपेंच मला कधींच साधत नाहींत. तुम्हीं मनांत आणलं तर तुम्हीं देखील मला फसवूं शकाल ?

**नीराः**—मी ? आपणाला फसवणार आणि तें कशाकरितां ?

**नेताजीः**—कशाकरितां तें मला सांगतां येणार नाहीं ! समजा इतक्यांत तुमचे बाबा आले आणि त्यांनीं विचारलं—तर काय जबाब देणार ? [ नीरा लाजते. ] आपण तर स्पष्ट सांगणार कीं, नीराबाईबरोबर बोलण्यांत मला फार आनंद वाटतो म्हणून ?

**नीराः**—अगबाई, आपण तर अगदीं मनकवडे दिसतां ! अगदीं भोळेपणाचं सोंग आणून मला फसविण्याचा तुमचा विचार दिसतो, पण लक्षांत ठेवा हं—आम्हीं मराठ्यांच्या मुली सहजासहजीं फसत नसतों.

**नेताजीः**—पण मी कुठं म्हटलं कीं, मी तुम्हांला फसविणार म्हणून ? बरं आहे निराबाई ! आपल्या बरोबर बोलण्यांत मी बराच वेळ घालविला, हो—मला आतां गेलंच पाहिजे. [ जाऊं लागतो. ]

**नीरा**—कुठं जाणार ? घरी कां ? हो आपली घरचीं माणसं मोठ्या उत्कठेनं वाट पहात असतील नाहीं !

**नेताजी**—उत्कंठीत झालेलीं माणसं मोठ्या उत्कंठेनं वाट पहात असतात खरीं ! परंतु माझ्याकरितां उत्कंठ होणारं माणूस कुणीच नाहीं !

**नीरा**—म्हणजे आपलं अजून लग्न झालं नाहीं तर ?

**नेताजी**—अहो, माझ्यासारख्या देशाच्या फकीराला मुलगी देतो कोण ? समजा, त्यांतून एकाद्या मुलीनं मला पसंत केलं तर तिचं कोड कौतुक करायला मला वेळ आहे कुठं ! आधीं देशाचा संसार आणि मग व्यक्तिचा संसार ! नीराबाई देशाच्या संसाराची झालेली धुळधाण प्रत्यक्ष दृष्टीपुढं दिसतांना मी माझ्या स्वतःच्या

संसारांत दंग होणं माणूसकीला धरून होईल कां ? जिथं हजारों जीवांचा संसार प्रत्यही वाताघातीला लागत आहे, भरल्या घरांतून आया बहिणी पळवून नेल्यामुळें हाः हाःकार उडत आहेत, गोरगरीब, दीनदुबळे पोटाकरितां वेळेवर भाकरी कशी मिळेल या विवंचनेंत आहेत, अशा वेळीं कोणता मनुष्य आपल्या स्वताचा संसार साजरा करण्यांत आनंद मानील.

१६ पद—राग–मालकंस–ताल–त्रिवट.

**कां सुखद संसार सजवि कुणि मातृ-भूमि-पदिं**
**दास्य शृंखला ॥ धृ० ॥**
**जन-करुणारव हृदय विहारी ॥**
**हाहाकारिं जरि देश बुडाला ॥ १ ॥**

**नीरा**:—नेताजीराव, आपले हे उदात्त विचार ऐकून मला किती आनंद झाला म्हणून सांगू ! मी देखील असाच निश्चय केला आहे कीं, ज्यावेळीं शिवाजी राजाचं कार्य पूर्ण होईल त्याच वेळीं मी लग्न करीन !

**नेताजीः**—भले बहाद्दर ! पण मला आपल्या लग्नाचं आमंत्रण द्यायला विसरूं नका अं ! असेन तिथून धावून यायला मी कमी करायचा नाहीं ! [ इतक्यांत शिपाई येतो. ]

**शिपाई**:—ताई सरकार घात झाला ! धनी साहेबांना आणि ताई सरकारांना बाजीच्या लोकांनीं कैद करून नेलं ?

**नीराः**—काय पकडून नेलं ?

**नेताजीः**—सर्प आपल्या जातीवर गेला नाहीं तर तो सर्प कसला ? पाहिलंत त्या दिवशीं तुमच्या बोलण्यावरून त्याला जिवदान दिलं—त्याचे त्यानं असे उपकार फेडले.

**नीराः**—नेताजीराव, बाबांची व ताईची सुटका करायला मी तुमच्याशिवाय दुसऱ्या कुणाला सांगू ? त्या दिवशीं आपण आमची लाज राखलीत—पण आताही लाज राखणं आपल्या हातीं आहे.

१७ पद—राग सिंधुरा ताल—त्रिवट

**मोक्षदायि पद हेचि मला ॥ साध्य सुलभ कार्याला ॥ धृ० ॥**
**कृतांत सम खल मर्दुनि विजिता ॥ गौरविती स्वानंदें वनिता ॥१**

आपण माझी एवढी कामगिरी केलीत—

**नेताजी:**—तर आपण मला कांहीं मोबदला द्याल हेंच ना ? मोबदल्याच्या आशेनं आम्हीं मराठे कुठलंही काम करीत नसतों ! अडलेल्या वेळीं कुणालाहीं मदत करणं मराठ्याचं कर्तव्य आहे ! नीराबाई, आपण आपल्या गढींत चला, आपल्या बाबांची व ताईची सुटका केल्याशिवाय—हा नेताजी आपल्याला तोंड दाखविणार नाहीं !

१८ **पद**—राग—धानी ताल त्रिताल

**असि समरिं विजयवति चतुरा ॥ काटिं कुशला विहरत विलसत अरि-रण-मद हरि, रणिं वितरुनि रिपुरुधिरा ॥ धृ० ॥ मेघ पटल लपवि गगनिं सविता ॥ क्षणिं वितरित किरणा तळपतां ॥ करिल मुक्त जनक भगिनि मुख-मणि हंसरा ॥ १ ॥**

[ एका बाजूनें नेताजी जातो व दुसऱ्या बाजूनें नीरा जाते. ]

---

## प्रवेश तिसरा

**स्थळ:**—घर

**गिरीजा:**—सर्जा, म्हणतोस काय ? इतकं त्याला साधेल तरी कसं ? त्याला कांहींच भिती वाटली नाहीं कशी ?

**सर्जेराव.**—उलट्या काळजाच्या माणसाला भीती हा शब्द ठाऊक नसतो, राक्षसी कृत्य करणं म्हणजे त्याचा रोजचा रोजगार असतो.

**गिरीजा:**—पण मानाजीरावांना कैद करून, त्याचा फायदा काय होणार आहे !

**सर्जेराव:**—काय होणार ? गिरिजे, तुला डोकं नाहीं—

**गिरीजा**—म्हणजे ? मला वेड लागलं कीं काय ?

**सर्जेराव:**—तसं नव्हे ! तुझं डोकं चालत नाहीं—

**गिरीजा:**—हा कुठला नवीन शोध शोधून काढलास तूं ? डोकं चालूं लागल्यावर मग पायांचा काय उपयोग ?

**सर्जेराव:**—हेंच तें ? थोडा डोक्याचा उपयोग केला कीं, पायाची गती कुंठित होते !

**गिरीजा:**—हा डोक्या पायांचा अभ्यास तूं केव्हांपासून करूं लागलास !

**सर्जेराव:**—बाजीकडे नोकरीला राहिल्यापासून ! त्याचं एकेक कृत्य पाहिलं कीं, माझं डोकं सुन्न होतं.

**गिरीजा:**—तें जाऊं दे रे ? मानाजीरावांना कैद करून त्यांचा फायदा काय, याचा कांहीं तूं उलगडा केला नाहींस !

**सर्जेराव;**—शिवाजीला मानाजीरावांची आंतून फुस आहे, असं पादशहाला खोटंच सांगून, राजद्रोही म्हणून त्याला कैद करण्याचा हुकूम मिळविला.

**गिरीजा:**—पण त्याच्या शब्दावर पादशहानें विश्वास कसा ठेवला ?

**सर्जेराव:**—राजाचे कान लांब असले कीं, कुणीही कांहीं सांगितलं तर तें त्याला खरं वाटत असतं ?

**गिरीजा:**—म्हणजे असला राजा अकलेचा खंदकच म्हणेनास !

**सर्जेराव:**—आतां निरेला कैद करून, सक्तीनें तिच्याशीं लग्न लावण्याचा त्यांचा विचार आहे !

**गिरीजा:**—पण ती लग्नाला कबूल झाली नाहीं तर—

**सर्जेराव:**—तिच्या कबुली नाकबुलीला विचारतो कोण ?

**गिरीजा:**—त्या चांडाळाच्या हातून तिची सोडवणूक तुला करतां येणार नाहीं का ?

**सर्जेराव:**—माझ्या हातून तिची सोडवणूक करणं शक्य असतं तर तुझ्या कानांवर ही गोष्ट घातली नसती ?

**गिरीजा:**—मग काय करूं म्हणतोस ?

**सर्जेराव**—तारेमुळं तुझी हिरोजी–सुधोजींशीं ओळख झाली आहे, ते शिवाजी राजाचे अनुयायी आहेत, तेव्हां ही हकीकत त्यांना कळीव म्हणजे, तेच तिची सोडवणूक करतील !

**गिरीजा**—होय ? हें माझ्या ध्यानींच आलं नाहीं !

**सर्जेराव**—येईल कसं ? पुरुषी डोक्यापुढं, बायकी डोकं चालणार कसं ?

**गिरीजा**—ही नुसती तुझी घमेंड आहे ! त्यादिवशीं माझ्या युक्तीमुळंच तुला बाजीला फसवतां आलं—

**सर्जेराव**—गिरीजे, वराती मागून घोडा, असं तुझं चाललं आहे ! मीच तुला आज्ञे हात बांधण्याची युक्ती सुचवली त्यावर तूं युक्ती रचविलीस !



नीरा:—तुम्हीं तर मनकवडे दिसतां !

**गिरजा**—सर्जा, तूं जर मला असा हरघडी हिणवशील, तर मी तुला भेटायला देखील येणार नाहीं !

**सर्जेराव**—मला भेटण्यासाठीं इतकं दूर येण्याचा त्रास तुला पडूं नये म्हणूनच एके ठिकाणीं राहण्याची युक्ती सुचवितों !

**गिरजा**—कसलीरे तुझी युक्ती ? प्रत्येक गोष्टींत तूं युक्तीचं घोडं पुढं करतोस !

**सर्जेराव**—त्यामुळें वरातीच्या वेळीं तरी घोडा शोधण्याची पाळी येणार नाहीं.

**गिरिजाः**—सर्जा, मी मुळीं आतां लग्नच करणार नाहीं !

**सर्जेरावः**—पण हा प्रेम संन्यास कां म्हणून ?

**गिरीजाः**—पुरुषाचा वरचष्मा टाळण्यासाठीं--

१९ पदः—मिश्र कॉफी—ताल—दादरा.

**अति कुटिल कपटि पुरुषजात स्वार्थ साधु सारी ॥**
**सेव्य-सेविकां समपरि सकल गणिति नारी ॥**
**ना स्वतंत्रता न मान सम समानता ॥**
**सदनिं कोंडिती अबला जॆवि धेनु कारीं ॥ १ ॥**

**सर्जेराव**—मी याला तडजोड सुचवितों !

**गिरीजाः**—कसली तडजोड !

**सर्जेरावः**—तुझा माझा जन्माचा जोडा जुळविण्यासाठीं मी माझ्या तोंडाला कुलुप घालतों ?

**गिरीजाः**—कुलुप घातल्यावर बोलणार कसा ?

**सर्जेरावः**—त्याची किल्ली तुझ्या हातांत ! म्हणजे तूं सांगशिल तें बोलेन, तुला आवडेल तें करीन, मग तर प्रेम संन्यास घेणार नाहींस ना ?

**गिरीजाः**—सर्जा, किती रे वेडा आहेस तूं ? गिरीजेला सर्जाशिवाय विसंबत नाहीं, आणि सर्जाला गिरिजेशिवाय करमत नाहीं.

२० पदः—राग—भूप ताल—त्रिवट.

**शशि-वदना बघुनि नभपथांत, कुमुदिनीं नितांत ॥**
**प्रशांत, खुले, फुले, डुले प्रणय-नव-लिलेंत ॥ धृ० ॥**
**जलधरांत परि लपतां ॥ भ्रांत विकल ती मुदिता ॥**
**उदास झुरत मनांत ॥ १ ॥**

थोडे दिवस जाऊं देत—

**सर्जेराव:**—म्हणजे सर्जेरावाची, सर्जेरावीन होणार असंच ना? किती गोड कल्पना?

**गिरीजा:**—आपण अशा गोड कल्पनेंत रंगून गेलों, तर निरेची निराशा होईल! तर तूं जा तिकडे, मी आलेंच, मुधोजी, हिरोजीची मदत घेऊन. [ दोघेही जातात. ]

---

## प्रवेश ४ था

**स्थळ;**—कारागृह.

**बाजी:**—मानाजीराव, ज्या प्रसंगाला मी भीत होतों तोच प्रसंग आज आला! शिवाजीच्या बंडाला आपली आंतून फूस आहे, म्हणून कुणी तरी पादशहाचे कान फुंकले असले पाहिजेत, त्यामुळंच आपल्याला कैद करण्याचा लेखी हुकूम त्यांनी पाठविला, मी मात्र दुहेरी पेचांत सापडलों आहे. एकीकडे पादशहाची आज्ञा तर दुसरीकडे मित्रप्रेम!

**मानाजी:**—आपण सांगितलं तर मला नाहीं वाटत कीं, पादशाहा आपल्या शब्दावर गैरविश्वास ठेवतील असं!

**बाजी:**—पण—

**मानाजी:**—पण काय?

**बाजी:**—मी कसं खोटं बोलूं? आपली सहानुभूती नाहीं हें जरी खरं असलं, तरी आपल्या मुली त्याच्या अनुयायांना गढींत येऊं देतात, त्यांच्याशीं प्रहरान् प्रहर बोलत असतात. मुलींच्या अविचाराबद्दल बापाला जबाबदार धरणं अन्यायाचं होईल कां?

**मीरा:**—बाजीसाहेब, मुलींच्या अपराधाबद्दल बापाला जबाबदार धरणं न्यायाचं आहे असं तुम्हाला वाटतं कां?

**बाजी:**—मला वाटणं अगर न वाटणं, यावर पादशहा थोडाच फिकीर करणार आहे?

**मीरा:**—बाबांना कैद करण्याचा हुकूम तुम्हांला पादशहाकडून आला असतां, तुम्हीं मला कां कैद केलंत?

बाजी:—मीरा, हें राजकारण आहे ! तुझ्या बाबांनाच कैद करण्याचा हुकुम असता, तर मी तुला कैद केलं नसतं ?

मानाजी:—म्हणजे ? मीरेला देखील कैद करण्याचा हुकुम पाठविला आहे ?

बाजी:—होय ! मानाजीराव, आतां तुमच्यापासून लपवून कशाला ठेऊ, तुम्हांला आणि मीरेलाच नव्हेतर गढींतलि सगळ्या लोकांना कैद करण्याचा हुकुम आला आहे ! आपली गढीही सरकार जमा झाली आहे.

मानाजी:—बाजीसाहेब तुम्हांला ह्यातून आमचा बचाव करतां येणार नाहीं कां ? आपला स्नेह ध्यानांत आणा !

बाजी:—आपला स्नेह ध्यानांत आणूनच, आज पावेतों मी आपणाशीं स्नेह भावानें वागत होतों. पण आतां स्नेहाचं नातं सांगितलं तर तुमच्या बरोबर मला ही चतुर्भूज व्हावं लागेल ! माझ्या उपदेशाचा विपर्यास तुमच्या मुलीनीं केला, मला देश द्रोही म्हणूं लागल्या. दुसऱ्याचं कल्याण चिंतिलें आसतां स्वताच्या शिलावर शितोडे उडूं लागल्यावर माणसानं काय करावं ?

मानाजी:—बाजीसाहेब, माझ्या मुलीनीं आपला आपमान केला असेल, तर माझ्याकडे पाहून त्यांना क्षमा करा ! त्यांना दुरदर्शीपणा कुठून असणार ?

बाजी:—मानाजीराव, तुमचं उतारवय, तशांत तुमच्यावर राजद्रोहाचा आरोप, याचा विचार केला तर कुणालाही किंव आल्याशिवाय रहाणार नाहीं. मी आजपर्यंत आपल्या शब्दाला जागलों. आतांही जागलों असतों पण एका अटीवर—

मानाजी:—बाजी साहेब आमचं जीवन सर्वस्व तुमच्या हातांत आहे. तेव्हां आपली कोणतीही अट मला मान्य आहे !

बाजी:—ती अट पुरी करणं तुमच्या हातीं नाहीं ! आपल्या मीरेच्या हातीं आहे.

मीरा:—बाजी साहेब अशी ती कोणती अट ?

बाजी:—दुसरी कोणती असणार ? मीरा, तुझ्या बाबांना उतार वयांत सुखी अगर दुःखी करणं, तुझ्या एका शब्दावर अवलंबून आहे !

मीरा:—बाबा करितां मी कोणतेंही दिव्य करायला तयार आहे ?

बाजी:—माझ्याशीं लग्न करण्याचं वचन दे, कीं या घटकेला मी तुझ्या बाबांना बंधमुक्त करायला तयार आहे, त्यामुळें माझ्यावर पादशहाचा रोष झाला तरी त्याची मी पर्वा करीत नाहीं.

मीरा:—लग्न म्हणजे बाहुला बाहुलीचा खेळ असं कां तुम्हांला वाटतं ? बाबांना संकटाच्या कैचींत धरून सक्तीनें माझ्याशीं लग्न करण्याचे डावपेंच खेळूं लागलांत, तरी ही मीरा लग्न करायला तयार होईल असं कां तुम्हांला वाटलं ?

बाजी०—मीरा, तूं माझ्याशीं लग्न केलेंच पाहिजे अशीतुझ्यावर सक्ती करीत नाहीं, अगर याचनाही करीत नाहीं.

मानाजीराव—मीरा ! बाजीसारखा सरदार, तुझ्याशीं लग्न करायला तयार झाला, हें तुझं भाग्य आहे समज !

मीरा—बाबा, सरदारीच्या मोहाला भुलून मी स्वतःच्या सुखाला पारखी होऊं कां ? बाजीसाहेब, त्यादिवशीं तुम्हीं निरेशीं लग्न करायला तयार झालांत—तिनें नापसंती दर्शवितांच तुम्ही सभ्यपणाची मर्यादा ओलांडल्यामुळें नेताजीपुढं तुम्हांला हार खावी लागली ! निरेच्या व माझ्या शब्दासाठीं तुम्हांला जीवदान दिलं, त्याचे उपकार तुम्हीं अशा रितीनें फेडायला तयार झालांत.

बाजी०—मीरा, शब्दानं शब्द वाढतात ! केवळ तुमच्या नांवाचा गांवभर बभ्रा होऊं नये, मानाजीराव मानकऱ्याचं नांव, बंडखोराच्या नामावळींत नोंदलं जाऊं नये म्हणून मी माघार घेतली ! नाहींतर नेताजीच्या रक्तानं माझ्या ह्या तरवारीला मी न्हाऊं घातलं असतं !

मीरा०—बाजीसाहेब, बाबांच्या भोळ्या स्वभावाला, तुमचं खोटं पांडित्य पटेल ! पण मला पटणं शक्य नाहीं ! त्याचा सूड तुम्हीं आज अशारितीनें घेत आहांत, हें न समजण्याइतकी मी भोळी आहें असं मात्र समजूं नका ! मी तुम्हांला स्पष्ट सांगतें कीं, हें सगळं कृष्ण कारस्थान तुमचं आहे. उगीच पादशहाचं नांव कां पुढं करतां ?

बाजी०—मानाजीराव, त्या शिवाजी नेताजीच्या सहवासानं निरे मिरेचीं डोकीं फिरलीं आहेत ! माझें कोणतेंही कृत्य त्यांना वाईट दिसतं आणि त्या बंडखोरांचीं कृत्यं मात्र चांगलीं वाटतात, आतां माझा नाइलाज आहे ! आतां तुमचं नशीब आणि तुम्हीं ?

मानाजी—नका, बाजीसाहेब, असे रागावूं नका ! मीरेची समजूत मी करतों ! हवंतर तिचं तुमच्याशीं लग्न ठरल्याचं वचन देतों !

मीरा—थांबा, बाबा वचन देऊं नका. वचनाला जागणं हें मराठ्यांचं ब्रीद आहे हें विसरूं नका ! माझ्या देहांत जीव असे पर्यंत तरी यांच्याशीं मी लग्न करणार नाहीं ?

**मानाजी०**—लग्न करणार नाहीं ? जसं कांहीं तुझ्या अनुमतीवरच सर्व कांहीं अवलंबून आहे ! मीरा, मी तुझा बाप आहे हें तूं विसरूं नकोस, मी सांगेन त्याच्याशीं लग्न करायला तूं तयार असलं पाहिजेस ! पित्राज्ञा पालन करणं हें मुलींचं कर्तव्य नाहीं कां ?

**मीरा:**—पण ती पित्राज्ञा देखील धर्माज्ञेला धरून असली पाहिजे? समजून उमजून मी आगींत उडी घेऊं कां ? बाबा, बाबा, मरणाच्या भीतीनं आपल्या मुलीच्या सुख सर्वस्वाची राख रांगोळी करायला तयार झालांत ? मरण कुणाला चुकलं आहे ? नेकजात मराठा नेकीसाठीं मरायला तयार होईल, पण नेकी सोडणार नाहीं ! बाबा, तुमच्यासाठीं मी वाटेल तें दिव्य करायला तयार आहें ? पण हें लग्नाचं मरण माझ्या पदरीं टाकूं नका !

## २१ पद—राग सोहनी—ताल त्रिवट

**मोह पटल नयना दाविना ॥ मोक्ष सदना करी वंचना ॥ धृ ॥**
**स्वसुखीं दुहिता नाश योजितां ॥ अंति निरयिं वरि देह दंडना ॥ १ ॥**

**बाजी:**—मीरा, लग्नाचं मरण टाळण्याकरितां तुझ्या बाबाचं मरण तूं उघड्या डोळ्यांनीं पाहणार कां ? तुझ्या बाबांना राजद्रोहाबद्दल, उद्या सूर्योदयाला तोफेच्या तोंडी दिलं जाणार, आणि तुला व निरेला जन्मभर कैदखान्यांत कुजत पडावं लागणार. मग बोल, लग्नाचं मरण पाहिजे कीं, हालाचं मरण पाहिजे ?

**मीरा:**—बाजी, मरणाची भीती पापी माणसांना ! तुमच्यासारख्या हिंदूचं नांव कलंकीत करणाऱ्या सैतानाशीं लग्न करण्यापेक्षां हालाचं मरण भोगयला मी तयार आहें !

**मानाजी:**—पण मीरा, मला तोफेच्या तोंडीं देणार, ही शिक्षा ऐकून देखील तुझा निश्चय बदलत नाहीं ! मीरा, हेंच कां तुझं पितृ प्रेम ? हेंच का तुझं मुलींचं कर्तव्य ?

**मीरा:**—बाबा, माझं पितृ प्रेम हिणकस नाहीं, अगर मुलींचं कर्तव्य मी विसरलें नाहीं ! कधींही कुणी पितृ प्रेम पाहिलं नाहीं, अगर मुलींचं कर्तव्य कुणी केलं नाहीं ! अशा कृतीनेंच मी पितृप्रेम दाखविणार आहें, मुलींचं कर्तव्य बजाविणार आहे !

**मानाजीः**—तरच तूं माझी मुलगी !

**मीराः**—होय, बाबा, तरच ही मीरा आपली मुलगी. माझ्यामुळंच आपल्यावर ही मरणाची आपत्ती आली आहे ! ही मीरा, आपली मुलगी स्वताच्या मरणानं ती टाळणार आहे ! ( खंजीर पोटांत खुपसून घेते. )

**मानाजीः**—मीरा, मीरा काय केलंस हें ?

**मीराः**—कर्तव्य ! बाबा, मी आपलं कर्तव्य करून, आपलं ऋण फेडीत आहे. फक्त माझ्या प्राप्तीच्या आशे करितां, या चुगलखोरानं पादशहाशीं कागाळी करून, आपल्यावर राजद्रोहाचा आळ आणला आणि माझी प्राप्ती झाली नाहीं, तर आपल्याला तोफेच्या तोंडीं देण्याचा हुकूम मिळवून ठेवला. याच्याशीं लग्न करण्यापेक्षां मरण पत्करीन, असं जर मी तुम्हांला सांगितलं असतं, तर अपत्यवात्सल्यामुळं तुम्हीं तोफेच्या तोंडी जायला तयार झालां असतां, पण तुम्हीं मरून देखील, माझं आणि मीरेचं मरण थोडंच टळणार होतं ! माझ्या एकटीमुळं, आपल्या नांवाला, कुलाला, कीर्तीला आणि आतांपर्यंतच्या आपल्या उज्वल राजनिष्ठेला जो कालिमा लागणार होता, तो माझ्या एकटीच्या मरणानं टळून जाऊन, आपण निर्दोष–निष्कलंक राहाल आणि आपल्या सर्वांचं कल्याणच होईल.

**मानाजीः**—मीरा, किती भयंकर आत्मत्याग केलास हा ? मी तुझ्या पितृपदाला योग्य आहे कां ? पुरुषासारखा पुरुष असून सुद्धां, नुसत्या मरणाच्या बातमीनं हृदय हादरून जाऊन, मला माझ्या कर्तव्याचा विचार पडला; तर तुझ्यासारख्या स्त्री जातीनं मला माझ्या कर्तव्याची जाणीव देण्याकरितां, हंसत मुखानं आणि प्रसन्न मनानं मरणाचं श्रेय घ्यावं, यापरती आम्हां पुरुषांच्या दौर्बल्याची दुरावस्था ती कोणती ! मीरा, मीरा, तूं आपले डोळे मिटूं लागलीस, पण माझे डोळे आतां उघडूं लागले आहेत.

**मीराः**—बाबा, बाबा, असा नका हो शोक करूं ! आपली मीरा, आज काय, किंवा उद्यां काय मरणारच होती. पण असलं भाग्याचं मरण तिच्या वाट्याला कधीं आलं असतं कां ? बाबा, बाबा, माझ्या आनंदाच्या वेळीं, आपण सुद्धां आनंदानंच आशीर्वाद नको कां द्यायला ? [ आशीर्वाद देतो–मीरा–प्राण सोडते. ]

**मानाजीः**—मानवी सैताना, माझ्या मीरेचं, माझ्याकरितां केलेलं हें अलौकिक दिव्य पहा–नाहीं तर तुझ्या सारख्या स्वार्थसाधूचीं अघोर–तृष्णा पहा ! ( पडदा ).

---

नाटक नं. ७५८
30-12-33

# अंक ४ था

## प्रवेश १ ला.

**स्थळ:**—किल्ला [ मानाजीला तोफेच्या तोंडी बांधिलें आहे—जवळ नीरा व बाजी उभे आहेत ]

**बाजी:**—नीरे, विचार कर ! अजून वेळ गेली नाहीं ! तुझ्या बाबांना तोफेच्या तोंडी देणं अगर त्यांना मुक्त करणं, हें तुझ्या हातीं आहे.

**नीरा:**—बाजी, जों जों तुम्हीं मला बाबांच्या मरणाची भीती घालतां, तों तों तुमच्याशीं लग्न न करण्याचा माझा निश्चय अढळ होतो आहे.

**बाजी:**—नीरे, तुझ्या निश्चयाचा अढळपणा कसोटीला लावण्याची वेळ जवळ आली आहे. तुझी मनधरणी करण्याचा माझा तो पडता काळ होता, पण आज माझी पाय धरणी करण्याचा तुझा पडता काळ आहे हें तूं विसरूं नकोस ! तुझ्या बाबांना मारणं किंवा तारणं माझ्या मर्जीवर अवलंबून आहे.

**नीरा:**—बाजी, जनन मरणाचं सूत्र, परमेश्वरानं माणसांच्या हातीं ठेवलं असतं, तर तुमच्यासारख्या उलट्या काळजाच्या सैतानाच्या पाशवी लहरीवर, माणसांचं मरणं अवलंबून राहिलं असतं; म्हणून परमेश्वरानं ही सूत्रं आपल्या हातीं ठेवलीं आहेत.

**बाजी:**—परमेश्वर ? नीरे, परमेश्वराला कुणी पाहिलं आहे कां ? फत्तराला परमेश्वर बनवून, भट भिक्षुकांनीं आपल्या उदर निर्वाहाचं साधन तयार केलं आहे. फत्तरांत परमेश्वराचा साक्षात्कार असता, तर मंदिरासकट फत्तराच्या मूर्ती नाश करण्याचं धाडस यवनांना झालंच नसतं !

**नीरा:**—बाजी, परमेश्वर फत्तरांतच काय पण प्रत्येक अणुरेणूंत व्यापून उरलेला आहे. परमेश्वर माणसांचं प्रत्येक कृत्य पहात असतो, पण माणसांना मात्र तो दिसत नाहीं. ज्या ज्या वेळीं धर्माचा ऱ्हास होतो, गोब्राह्मणांचा छळ होतो, त्या त्या वेळीं परमेश्वरानं अवतार घेतला आणि दुष्टांचा संहार करून, धर्माचं–गोब्राह्मणांचं रक्षण केल्याचं, प्रत्येक अवताराकडे सूक्ष्म निरीक्षण केलं तर तुम्हांला दिसून येईल. या वेळींच परमेश्वर कर्तव्याला विसरला असेल असं तुम्हांला वाटतं कां ?

**बाजी:**—नीरे, मला वाटतं इतकंच नव्हे, तर अवतार विवतार हें सर्व थोतांड आहेत; भाविकांच्या भ्रामक कल्पना आहेत.

**नीरा:**—बाजी, पापी माणसांचीच परमेश्वराविषयीं भ्रामक कल्पना झाली आहे. राम अवताराच्या वेळीं देखील अशीच भ्रामक कल्पना रावणादीअसुरांची झाली होती. बाजी, परमेश्वर लांब नाहीं, जवळ आहे. या मावळकोंड्यांत संचार करीत आहे.

**बाजी:**—काय ! या भिकार मावळ कोंड्यांत आहे ?

**नीरा:**—होय ! परमेश्वर गोरगरिबांचा पाठीराखा असतो. राजांच्या राजवटी-पेक्षां गरिबांची झोपडीच त्याला अधीक प्रिय असते. परमेश्वर समोर असून तुम्हांला दिसत नाहीं. गरिबांच्या हांकेला, अबलांच्या संरक्षणाला धावून येणारा परमेश्वर, मावळकांड्यांतील मावळे, मराठे—आणि कुणबी लोकांना देखील माहीत आहे. पण तुम्हांला मात्र दिसत नाहीं.

**बाजी:**—नीरे, तुमच्या या परमेश्वराचं नांव तरी ऐकूं दे मला !

**नीरा**—बाजी, नुसतं नांव ऐकून तुमची तृप्ती होणार नाहीं. नामोच्चाराबरोबर परमेश्वर समोर उभा राहतो, संकटांचं निवारण करतो. दुर्जनाना काळासारखा दिसतो आणि सज्जनांना परमेश्वरासारखा वाटतो.

**बाजी**—नीरे, परमेश्वराच्या नुसत्या नामोच्चारानं, तुझ्या बाबांचा मृत्यू थोडाच चुकणार आहे ! या पहा दिशा फाकल्या, सूर्योदयाची वेळ झाली. आतां मला बोलायला वेळ नाहीं. बोल, तुझे बाबा जगावे अशी तुझी इच्छा आहे कां ?

**नीरा**—बाजी, बाबांना मारणं तुमच्या हातीं नाहीं आणि त्यांना तारणं माझ्या हातीं नाहीं. तें फक्त एका परमेश्वराच्या हातीं आहे. परमेश्वरानं जर बाबांना मारायचं मनांत आणलं आणि आपली इच्छा त्यांना वाचवायची असली, तरी आपण त्यांना वाचवूं शकणार नाहीं. उलट आपली इच्छा बाबांना मारायची असली आणि परमेश्वराच्या मनांत त्यांना वाचवायचं असलं तर वाटेल त्या उपायानं, तो बाबांचं संरक्षण केल्याशिवाय राहणार नाहीं, अशी माझी बालंबाल खात्री आहे.

**बाजी**—बस्स कर तुझी बडबड ! तुझ्यासारख्या बोलभांड पोरीबरोबर वितंडवाद करून, काळाचा अपव्यय करणारा मी नादान नाहीं. मानाजी, ऐकलीस तुझ्या पोरीची बडबड ! आहे तिला तुझ्या विषयीं दया ? शहाणा असशील तर तूं अजून तिला माझं म्हणणं कबूल करायला लाव !

**मानाजी**—हरामखोरा, आतां हा मानाजी तुझ्या हातातलं बाहुलं राहिला नाहीं. मीरेच्या मरणानं माणुसकींत आलेला हा मानाजी, तुझ्या या धमकावणीला मुळींच भीक घालणार नाहीं. नीरेला तुझ्याशीं लग्न करण्याला सांगण्यापेक्षां मी तोफेच्या तोंडी जायला आनंदानं तयार आहे. हिंमत असेल तर वेळ न गमावतां बत्ती लाव ! कर्तव्य करतांना मरणारे मराठे मर्द असतात, हें तुझ्या सारख्या नामर्दांना तरी कळून येईल.

**बाजी**—बस्स ! बोलण्याचा अतिरेक झाला. इतक्यावेळ दिलेल्या सवलतीचा तुम्हीं दुरुपयोग केलात ! ये, लगाव बत्ती !

**नीरा**—बाबा, बाबा, तुमच्यासारख्या कर्तव्य परायण माणसाला या दुर्जनाच्या हातून जरी मरण आलं, तरी सत्यासत्याचा निवाडा करणाऱ्या परमेश्वरी दृष्टीनं, तुम्हीं अमरच राहणार आहांत !

**बाजीः**—नीरे, तोफेच्या एका धडाक्या सरशीं, तुझ्या बापाच्या देहाचे झालेले छिन्न विछिन्न तुकडे, तुला हवेंत तरंगतांना दिसतील, मग तुझा बाप कसा काय जिवंत राहतो हें तुला पहायला मिळेल.

**नीराः**—कर्तव्यवंताचं मरण पाहणं, हें देखील भाग्य आसावं लागतं. बाजी, संकट परंपरा कुणाला चुकली आहे का ?

२२ पद राग—भैरवी ताल त्रिवट

**दिनमणि शशिकरा असुरांसुरा, भय आपदा टळेना ॥ धृ० ॥**
**परमश्रेष्ठ पद प्राप्त जयांना ॥ नच त्यजि धृति बल कदां ॥ भव संगरा ॥ १ ॥**

**बाजीः**—तुझ्या बापाचा असला मरण सोहळा पाहायला, तुझा तो लाडका नेताजा पाहिजे होता नाहीं ?

**नीराः**—ते जर जातीनें हजर असते, तर बाबांना तोफेच्या तोंडी द्यायची तुमची छातीच झाली नसती. आपण दिलेल्या जिवदानाचा मोबदला, बाबांना तोफेच्या तोंडी देण्यांत झाला, हें जर त्यांना कळलं, तर ते आपल्याला जिवंत ठेवणार नाहींत हें पक्कं समजून असा ?

**बाजीः**—मला समज द्यायला, मी जिवंत ठेविन तर ना त्याला ?

**मानाजीः**—सैताना, बोलण्यांत वेळ दवडून माझं मरण लांबणीवर कां टाकतोस ?

**बाजीः**—काय रे ? असा तोंडाकडे काय पहात राहिलास ! या म्हाताऱ्याला मरणाचा चळ लागला आहे. मरूं दे त्याला लवकर ! चल लगाव ! [ शिपाई बत्ती लावणार तोंच नेताजी येतो ]

**नेताजीः**—हं, सबूर ! हा नेताजी जिवंत असतांना, कुणाची छाती आहे मानाजीरावांना तोफेच्या तोंडी द्यायची ! हरामखोरा, हं घे बक्षीस ! ( शिपायावर वार करतो. )

**बाजीः**—पकडा या बंडखोराला !

**नेताजीः**—ठीक आहे. हातच्या कांकणाला आरसा कशाला पाहिजे ? पाहूं कोण कुणाला पकडतो तो ! ( लढाई सुरू होते, नेताजी एका शिपायावर वार करतो, बाजी मागून नेताजीवर वार करणार तोंच आंतून "शाबास, नेताजी शाबास, मी आलोंच तुझ्या मदतीला " असं म्हणत शिवाजी येतो )

**बाजीः**—कोण ! शिवाजी ? [ शिवाजीकडे पाहून भयचकित होतो, त्या संधीचा फायदा घेऊन, नेताजी त्याची तलवार पाडतो व त्याला पकडतो ]

**शिवाजीः**—नेताजी, मानाजीरावांना, हा बाजी तोफेच्या तोंडी देणार आहे, ही बातमी मला गुप्त हेराकडून कळतांच, मी त्यांना सोडविण्याकरितां धांवत आलों ! पण माझ्या अगोदर तूंच त्यांना वाचविण्याचं श्रेय घेतलंस ?

**नेताजी॰**—या श्रेयाचं बक्षीस द्यायचं असेल, तर या बाजीला तोफेच्या तोंडी द्यायचा मला हुकूम द्या ! आपल्याला दगलबाजीनं पकडून विजापुरला पाठवायला तयार झालेला हा हरामखोर अशाच मरणाला योग्य आहे. चलारे, सोडा त्या मानाजीरावांना, आणि बांधा या दगलबाजाला तिथं !

**बाजी॰**—शिवाजीराजे, मी तुम्हांला शरण आलों आहे. क्षमा करा ! मला तोफेच्या तोंडी देऊं नका !

**नेताजी**—महाराज याच्या मायावी भाषणाला भाळूं नका ! या काळ सर्पाला आपण जिवंत सोडलंत, तर पुढं मागं आपल्याला दंश केल्याशिवाय राहणार नाहीं.

**शिवाजी॰**—नेताजी, शरणांगतावर दयाकरणं हें मराठ्यांचं ब्रीद आहे. नेताजीच्या प्रेमाच्या झगड्यांत, बाजीला शिवाजीच्या हातून मरण आलं, असा

दुर्लौकिक होऊं नये, म्हणून मी आतां याला सोडून देतों ! या उप्पर यानें माझ्या विरुद्ध कारस्थान केलं, तर मी याला मारल्याशिवाय राहणार नाहीं असं मी तुला वचन देतों.

**नेताजी०**—महाराज, आपल्या आज्ञेबाहेर मी नाहीं ! मी याला सोडायला तयार आहे, पण एका अटीवर !

**शिवाजी०**—कसली तुझी अट ?

**नेताजी०**—प्रथम या मानाजीरावांच्या पायां पडून, निरेचे पांय धरावे, आणि त्यांची क्षमा मागावी. ( बाजी तोंड वेडेंवाकडें करून तसं करतो. ) जा, अजून तरी शुद्धीवर ये. पुन्हां जर माझ्या हातीं सांपडलास, तर जिवंत सुटणार नाहींस !

**बाजी०**—[ स्वगत ] याचा सूड घेईन तरच मी नांवाचा बाजी ! ( जातो )

**मानाजी**—[ शिवाजीला वंदन करतो. ] शिवाजीराजे, आपल्या उदार हृदयाची मला कल्पना नव्हती ! पण आज माझा पुनर्जन्म झाला. यापुढं विजापुरची गुलामगिरि सोडून देऊन, आपल्या स्वराज्य स्थापनेच्या कार्यासाठीं, माझा आपण योग्य तो उपयोग करून ध्यावा हीच माझी आपल्याजवळ विनंती आहे.

**शिवाजी**—मानाजीराव, आपल्या विनंतीचा मी स्वीकार करतों. आपल्यासारखे कर्तव्यपरायण लोक मला मिळाल्यानं, माझं स्वराज्याचं कार्य सुलभ होणार आहे. नेताजी, आपली नेमलेली कामगिरी सोडून, इतक्या गडबडीनं इथं यायचं काय बरं कारण ? [ दोघेंही खालीं पहातात. ]

**मानाजी०**—शिवाजीराजे, मी देतों याचं उत्तर ! याचं परस्परांवर प्रेम आहे आणि दोघंही एकमेकांना मनानें वरून चुकलीं आहेत.

**शिवाजी**—अस्सं कां ? मग उघड बोला ! यांचा लग्न-सोहाळा केव्हां उरकून टाकायचा ?

**नीरे**—छे, छे, महाराज, आपलं स्वराज्याचं कार्य पूर्ण होईपर्यंत मला मुळीं लग्न करण्याची इच्छाच नाहीं.

**नेताजी**—माझी पण तशीच इच्छा आहे.

**शिवाजी**—नेताजी, माझं हें स्वराज्याचं कार्य किती वर्षांत संपेल हें कुणाला तरी सांगता येईल कां ! आणि तोपर्यंत तुम्हीं अविवाहित राहणार ? अविवाहीत राहून, दोघांची मनं आकर्षीत राहिल्यामुळं, स्वराज्याच्या कार्यांत कुचराई होण्याचा

संभव आहे, त्यापेक्षां लग्न करून, शक्ती आणि युक्तीच्या सहाय्यानेंच स्वराज्याच्या सेवेचं कार्य जास्त सुलभ होणार आहे ! नेताजी, स्त्री, ही जगाची आदिशक्ति आहे. तिला प्रसन्न करून घेण्यांतच, पुरुषांचा पुरुषार्थ आहे, आणि एकदां ती प्रसन्न झाली म्हणजे वाटेल त्या दुर्धर प्रसंगांतून पार पडण्याचं सामर्थ्य पुरुषांत येत असतं ! मग सांग, अशा आदिशक्तीचा तूं अव्हेर करणार ?

**नेताजी**—महाराज, आपल्या आज्ञे बाहेर मी नाहीं.


**शिवाजी**—[ नीरेचा हात नेताजीच्या हातांत देतो ] तुमच्या पोटीं जन्म घेणारी भावी पिढी, आपल्या स्वराज्याचं संरक्षण करणारी निघो, असा माझा तुम्हांला आशिर्वाद आहे.

### २३ पद राग—ललत ताल त्रिवट

**अवनति हरि करुणाघना ॥ वितरि सुमति जनिं दास्य-मोचना ॥ ध्रु ॥ परवशता । पाश विनाशा ॥ मत्सर भावा त्यजुनि स्वदेशा ॥ स्वतंत्रता धन वरि विमल यशा ॥ उपजो जन हृदिं ऐक्य भावना ॥ १ ॥**

## अंक ४ था समाप्त.

मराठी ग्रंथ संग्रहालय
ग्रा. मार्क नं. ६५
ता. ३०-१२-७३
९११८
नाटक



अल्पावधींत लोकप्रिय झालेलें

उपाहाराचें व भोजनाचें

गिरगांवांतील एकच अप-टु-डेट ठिकाण

# धि आयडियल

हिंदु

# रिफ्रेशमेंट होम

खटाव बिल्डिंग, मॅजेस्टिक सिनेमाशेजारीं

समारंभ, रिसेप्शन फेअरवेल व इतर पार्टीज उत्सव गॅदरिंग्ज व इतर मंगल प्रसंगींच्या ऑर्डर्स आयडियलनें समाधानकारक रीतीनें पुरविल्याची या दोन चार महिन्यांतच अनेक नांवाजलेल्या संस्था व सभ्य गृहस्थांकडून सर्टिफिकिटें मिळविलीं आहेत.

मॅनेजर.

मेसर्स पाटील आणि कंपनीची

# जनता जनार्दन टूथ पावडर

# जनता शिकेकाई पूड

शिवाय सर्व सुपारीवर ताण करणारी

# दखनची राणी

सुपारी घ्या व मुख शुद्धी करा ?

जनता शिकेकाई उत्कृष्ट असून

केस पांढरे होत नाहीं.

कॅनव्हासर पाहिजेत

लिहा अगर समक्ष भेटा.

बोरभाट घर नंबर १३

पाटील अँड कंपनी,

मुंबई नं. ४.

# कोळशाची बुकी वापरूं नका

कोळशाच्या बुकींत निलगिरी तेल घालून बाजारांत काळी दंत पावडर या नांवानें विकतात. पण ही मूळ ( Originally ) कशापासून बनविलेली आहे, ह्याची चांगली चौकशी करा. उगाच ' जुनें तें सोनें ' ह्या म्हणीवर फसूं नका.

# झरा आमंड ब्लॅक टूथ पावडर

ही निव्वळ १०० टक्के बदामाच्या सालीपासून बनविलेली असल्यामुळें, दांताचे व हिरड्यांचे रोग बरे होतात. ह्यांत गांवठी अगर विलायती कोळशाची बुकी मुळींच नाहीं. एक वेळ आपण झरा कंपनीचा माल वापरा म्हणजे आपण कायमचे गिऱ्हाईक व्हाल.

विशेष व्यापारी माहितीकरितां खालील पत्त्यावर लिहा:—

# झरा परफ्युमरी

बद्दल मुंबईतले विख्यात ॲनलिटीकल् केमिस्टस् **ह्युनेस ॲन्ड डेव्हिस** काय म्हणतात ?

"आम्हीं शास्त्रोक्त रीतीनें ब्रिलियन्टाईनस्, लेमन् आमंड क्रीम्स, हेअर ऑईल्स्, बाम, वगैरे पृथक्करण केलें त्यावरून आमचें मत असें आहे कीं, केंस, त्वचा किंवा दांत यांना बिलकुल अपायकारक नाहीं व गिऱ्हाईकांना बिनधोक घेण्यास मुळींच हरकत नाहीं. अशी आम्हीं शिफारस करतों."

विशेष माहितीकरितां लिहा:—

सोल एजन्टस:—**वसंत ब्रदर्स**, दोन हत्तीजवळ मुंबई, ४.

# आनंदाची बातमी.

आमचे येथें सर्व तऱ्हेचे फोटो, फ्रेमींग व रिपेरींग काम, तसेंच सुबक व मनपसंत क्राटवर्क वगैरे स्वस्त दरानें करून देऊं आणि सर्व तऱ्हेची पिक्चर्स व्यापारी भावानें विकत मिळतील.

पत्ताः—

सिताराम भिवा धुळप फ्रेममेकर.

गोरेगांवकर वाडी, गांवदेवी, मुंबई ७.

## पहिलीच स्वदेशी व गुणानें सर्वोत्कृष्ट

हुबळी प्रदर्शनांत पं० जवाहिरलाल यांचे हस्तें

सुवर्णपदक मिळालेली

# औंध शेव्हिंग क्रीम वापरा

या क्रीमचा फेस बराच वेळ टिकणारा असून दाढी इतकी मऊ होते कीं दाढी करण्याचें काम त्रासाचें नसून उलट सुखाचेंच आहे असें वाटतें.

**दाढी केल्यानंतर स्नो लावण्याची मुळींच जरूरी भासणार नाहीं.**

## ( तयार करणार )

# 'पॉरोनस' साबू

अनेक शोध करून निश्चित केलेल्या प्रमाणानुसार हा साबू तयार करण्यांत आला असून अशा तऱ्हेच्या कोणत्याहि देशी अगर विदेशी उच्च प्रतीच्या साबूमध्यें आढळून येणारे गुण आमच्याही साबूमध्यें आहेत, अशी आम्हीं खात्री देऊं शकतों.

सोल एजंटसः—कुमार एजन्सी, काँग्रेस हाऊस, गिरगांव.

॥ श्री जनोबा प्रसन्न ॥

थोडक्या दरांत परंतु मनपसंत व समाधान
वृत्तीनें जेवणाचें ठिकाण.

भरपूर व स्वच्छ हवा, व उजेड यांनीं युक्त
असे मोहन बिल्डिंगचे भव्य
इमारतींत असलेलें,

# वाड-यांचे-भोजन गृह

| | दोन वेळ | दरमहा एक वेळ | वेळीं |
|---|---|---|---|
| दरमहा | १५८– | ,, ९८– | -।- |
| स्पेशल क्लास | १८ | ,, १० | ,, -।≡ |

बाहेर गांवांहून येणारे लोकांकरितां
खास सवलतीचे दर.

मालकः—हरी लक्ष्मण वाड.

# जाहीर खबर.

## भाव कमी करण्यांत आले !

सर्व लोकांस जाहीर करण्यांत येतें कीं प्रख्यात असलेल्या आमच्या जुन्या व नांवाजलेल्या

## " न्यू ल्यामिंग्टन लाँड्री "

मध्यें हल्लीं आमच्या ग्राहकांच्या सोयीसाठीं फारच सवलतीचे दर ठेवण्यांत आले आहेत,

**प्रत्येक सफेत कपड्याचा दर**

**३ पैसे**

ठेविले आहेत. शिवाय रेशमी व जरीच्या कपड्यांचा भाव

**फारच कमी केला आहे.**

यास्तव सर्व ग्राहकांनीं आमच्या लाँड्रीचा अवश्य फायदा घ्यावा.

**४ दिवसांनीं कपडा धुवून मिळेल.**

ठिकाणा-ल्यामिंग्टन रोड, पोलीस स्टेशनसमोर, लक्ष्मी चाळ, ग्रँट रोड.

Telegrams:
**Bus-body
Bombay.**

Telephone:
**41684.**

# ON GOVERNMENT LIST

# P. Shah & Co.

**Dwarkadas Mansions,
Sandhurst Road,
Bombay 4.**

Wholesale dealers in Rexine, Leather Cloth, Upholstery Hide Leathers, Chamois Leathers, Sofa Springs, Casters, Motor-Body Fittings, Hood Cloth, Canvas, Motor Buttons, etc.